# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००४ |
| वर्ष | : | सहावे |
| अंक | : | १ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या “ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ८८**

MAHMARI 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष सहावे / अंक १ / डिसेंबर २००४

## संपादकीय

### तरी सुद्धा ''हॅपी न्यू इअर !!''

२००४ संपताना मनात नेहमीप्रमाणेच प्रश्नांची उतरंड आहे. ''प्रतिवर्षीप्रमाणे.......'' या सरत्या वर्षीही माणसं त्याच त्या कार्यक्रमांच्या रिंगणात फिरताना दिसली, तीच वृत्तपत्रे त्याच बातम्या, त्याच त्याच निवडणुका, त्यांचे ''इ-रिझल्टस्''..... २००४ सालापुरती छापलेली बारा पाने किंवा ३६५ चौकानांचे रकाने संपले म्हणून जानेवारी महिना उजाडेल, या पलीकडे काय नवीन आहे?

यावर माझ्या मित्रांच म्हणणं, नवीन म्हणजे काय व्हाव असं तुला वाटतं?, मी बुचकळ्यात पडलो. नव्याची व्याख्या म्हणजे काय हे न सुचण्या एवढीही कल्पकता राहू नये असं मशीन म्हणजे आपण आहोत असं वाटायला लागलं किंवा असंही असेल की नावीन्याचे आपले संदर्भ कालबाह्य ठरत चालले असतील. नाहीतरी या व्यक्तिसापेक्ष संकल्पना प्रश्नांच्या कोंडीतच पकडतात आपल्याला.

जगायची पण सक्ती आहे

मरायची पण सक्ती आहे

या ओळीतले आता थोडे थोडे समजायला लागले, अशा भासांची वादळं ! मर्ढेकर, जी. ए. आणि केशवसुत न समजताच उत्सव साजरे होतात, आनंद सोहोळेही होतात, हे ही साहजिकच ! जगण्यातल प्रयोजन संपू देऊ नकोस असं संत महात्मे सांगतात. तेही बरोबरच आहे. तर असं असणार आहे पुढलं वर्ष, आपण काहीही केल नाही तरी येणारं, आपण मग स्वागत करायला हव नाही का, अगदी मराठीत, 'हॅपी न्यू इअर' म्हणत, किंचाळत.

ज्येष्ठ कवी विंदा करंदीकरांच्या एका कवितेच्या चालीवर म्हणण्याचे झाल्यास

कॅलेंडर ही बदलून पाहिली

तारखा बदलणे शक्य नव्हते,

दिवस उजाडणे, मावळणे आपल्या हातात नाही आहे या क्षणाला बरोबर आहोत हाच आनंद या सर्व प्रश्नांनी त्यामुळे व्हायला आले तरीसुद्धा

हॅपी न्यू इअर !!!!

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष सहावे / अंक १ / डिसेंबर २००४

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ९ वे / अंक ६ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री ज्ञानेश्वर महाराज यांचे जीवन व कार्य (लेखांक तिसरा) | शं. बा. मठ | ३ |
| २) | डॉ. मो. दि.पराडकर यांचे आत्मकथन | | ८ |
| ३) | बृहदीश्वर (राजराजेश्वर) मंदिर, तंजावर | मंजिरी दांडेकर | १५ |
| ४) | भावी शिक्षण | पुं.गो.मणेरीकर | १८ |
| ५) | साद | गीतेश गजानन शिंदे | २७ |
| ६) | विमनस्कपणाचा अंतर्मुख करणारा आविष्कार - जीर्ण देव्हारा | मोहन पाठक | ३० |
| ७) | कल्याण शहराच्या प्राचिनत्वाचे शिलालेख | श्री. र. पुरोहित | ३२ |
| ८) | आनंदाचे डोही | सौ. रश्मी कुलकर्णी | ३६ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३९ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# श्री ज्ञानेश्वर महाराज यांचे जीवन व कार्य...
## (लेखांक तिसरा)

*ज्ञानेश्वर महाराजांच्या जीवनकार्याचा तत्कालिन परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर परिचय करून देणारी लेखमाला*

*- संपादक*

### चांगदेव आणि ज्ञानदेव

ज्ञानेश्वरांचे समकालीन चांगदेव शके १२१८त समाधिस्थ झाले. दुसरे मुधेश चांगा उर्फ केशवदास हे शके १४२७ मध्ये समाधिस्थ झाले. दोघात २००-२५० वर्षांचे अंतर आहे.

चांगदेव देखणे होते. त्यांच्या अंगकांतीमुळे लोक त्यांना चांगदेव म्हणू लागले. ते शंकराचे उपासक होते. त्याच्या प्रसादाने त्यांना नाना विद्या, कला प्राप्त झाल्या. श्रुति, न्याय, व्याकरण, ज्योतिष, रसविद्या, नाडीज्ञान, धनुर्विद्या, कामशास्त्र, गायन कला, इत्यादिमध्ये चांगदेव निपुण होते. याशिवाय परकाया प्रवेश, दुसऱ्याचे मनोगत जाणणे, वस्तूमात्राची परीक्षा करणे, उदकावर चालणे या गोष्टी त्यांना सहज वाटत होत्या. वज्रासन साधून त्यांनी षट्चक्रभेदन साधले होते. इतकी योग्यता - चांगदेवास प्राप्त झाली होती.

परंतु अहंकाराचे पोषण करण्यात चांगदेवाच्या आयुष्याची १४०० वर्षे खर्च झाली. चांगदेवांचा सिद्धाश्रम तापी तीरावर असून तेथे यात्रेकरूंची सतत ये-जा चालू असते. शंभर वर्षांचा काल येताच ते आका ब्रह्मांडी नेऊन बसत, याप्रमाणे चौदा वेळा काळाला योगबळाने परतविले होते.

ज्ञानेश्वर महाराजानी पैठणास रेड्याच्या मुखातून वेद बोलविल्याची वार्ता पसरली. वार्ता, विद्या, परिमल व पाण्यावरील तैलबिंदू पसरतात त्याप्रमाणे पसरली. याबद्दल प्रसन्न राघव नाटकात कवि जयदेव म्हणतात -

वार्ता च कौतुकवती विमळा च विद्या ।
लोकोत्तरः परिमलश्च कुरंगनाभेः ।
तैलस्य बिंदुरिव वारिणी दुर्निवारं ।
एतत् त्रयं प्रसरति स्वयमेव भूमौ ॥

एका पांथस्थाने ही माहिती त्यांना सांगितली. ती ऐकून ज्ञानदेवांना भेटण्याची चांगदेवाना इच्छा झाली. चांगदेव अहंकारी, त्यांनी पत्र पाठविण्याचे ठरविले. परंतु मायना काय लिहावा हे काही सुचेना. शेवटी शिष्याकरवी कोरा कागदच पाठविला. तो ज्ञानदेवाला पोचला. मुक्ता तिथेच होती. ती म्हणाली, १४०० वर्षे तप करून हा अद्याप कोराच राहिला आहे. निवृत्तीनाथांच्या सांगण्यावरून ज्ञानदेवानी चांगदेवास पत्रानेच उपदेश लिहून पाठविला. तो ६५ श्लोकात लिहिला गेला म्हणून त्याला 'चांगदेवपासष्टी' असे म्हणतात.



स्वस्ति श्री वटेशु । जो लपोनि जगदाभासु ।
दावी मग ग्रासु । प्रगटला करी ॥ १॥

प्रगटे तव तव न दिसे । लपे तव तव आभासे
प्रगट ना लपला असे । न खोमता जो ॥२॥

बुद्धीत देहाहंकारादि प्रपंच उदय झाला असता स्वरूप ज्ञान आच्छादिले जाते व बुद्धीतच स्वरूप बोधाचा उदय झाला

असता देह अहंकारादी प्रपंच आपोआप मावळून जातो. एवढाच बोध येथे घ्यावयाचा.

सोने सोनेपण उणे । न येताचि जाहले लेणे ।
तेवी न वेचिता जग होणे । अंगे जया ॥ ४ ॥

सोनेपणे न घालवताच अलंकार निर्माण होते त्याप्रमाणे आत्मतत्व न घालवताच जग हे निर्माण होते.

ज्ञानदेव म्हणतात तुझा माझा संवाद म्हणजे -

बोलेचि बोल ऐकिजे । स्वादेचि स्वाद चोखिजे
का उजिवडे देखिजे । उजिडाजेवी ॥ ३९ ॥

बोलच बोलाचे ऐकणे होईल, रुचि रुचीचा स्वाद घेईल, उजेडच उजेडाला पाहिल, आपण एक आहोत द्वैतभावच नाही तेव्हा असे घडते. असे ज्ञानदेवानी सांगितले आहे.

एवं ज्ञानदेव चक्रपानी ऐसे । दोन्ही डोळस आरसे
परस्पर पाहता कैसे । मुकले भेदा ॥६२॥

परस्पर दोन आरिसे असता आपणच आपणाला पाहतो तिथे भेद कोठून

तिथेपण इया । दर्पण करील ओविया ।
तो आत्मा एवोदयज्ञ । मिळेल सुटया ॥६३॥

ते पत्र हाती पडताच चांगदेव ज्ञानदेवाच्या भेटीस निघाले. वाघावर स्वार होऊन लवाजम्यासह आळंदी सन्निध्य आले. ज्ञानदेवाना ही वार्ता कळताच बसलेल्या भिंतीलाच आपले वाहन बनवून त्याच्या समोर टाकले. हे पाहताच चांगदेव चकित झाले त्यानी दंडवत घातले. निर्जीव जडात चैतन्य निर्माण करणे ही अगाध गोष्ट आहे. हे पाहताच चांगदेवाचा अहंकार निमाला. त्याचे डोळे निर्मळ झाले. तिथे प्रेमाश्रू वाहू लागले. वाचा सद्गदीत झाली. चांगदेवांच्या अंतरंगात रुपांतर झाले. चांगदेव ज्ञानदेवाचे भक्त झाले. ज्ञानदेव भिंतीवरून खाली उतरले. त्याना कुरवाळले. ज्ञानदेवांचा हस्त स्पर्श होताच चांगदेवांच्या अंतर्यामात ज्ञानोदय झाला.

चांगदेव शरण आले. गर्वज्वर उतरला. ते ज्ञानदेवांच्या संगतीत राहिले. वृत्ती अंतर्मुख झाली.

योगयाग विधि येणे नोहे सिद्धि ।
वायाचि उपाधि दंभधर्म ॥१॥

भावेविण देव न कळे नि: संदेह ।
गुरुविण अनुभव कैसा कळे ॥२॥

तपेविण दैवत दिधल्याविण प्राप्त ।
गुजे विण हित कोण सांगे ॥३॥

ज्ञानदेव सांगे दृष्टांताची मात ।
साधूचे संगती तरणोपाय ॥४॥

मुक्ताबाई तुम्हाला उपदेश करील असे ज्ञानदेव म्हणाले.

एकदा मुक्ता सहजावस्थेत स्नान करीत असता चांगदेव तेथून जात होते. मुक्ताईला त्या अवस्थेत पाहून त्याना लाज वाटली. स्नानोत्तर चांगदेव मुक्ताईला म्हणाले, माझी काय चूक झाली तुम्ही मला निगुऱ्या का म्हणालात. मुक्ताई म्हणते -

जरी कृपा असती तुजवरी । तरी विकार न येता अंतरी।

भिंतीस कोनाडे तैसिया परी । मानुनी पुढे येतासा ।

जनी वनी हिंडता गाय । वस्त्रे नेसून असती काय ।

त्या पशू ऐशीच मी पाहे । तुज का नये प्रत्यया ।

हे उत्तर ऐकताच चांगदेव मनात चपापले. मुक्ताची खरी योग्यता यावर बुद्धीत प्रकाश पडला. ज्ञानदेवांच्या सांगणेवरून मुक्ताईने चांगदेवास उपदेश केला.

भावे भक्ति करूनि वैराग्य जोडसी ।
तरी तू पावसी ब्रह्म सुख ।
ज्ञानतत्वाकरी करी हा विचार ।
निर्गुणी आकार निरामय ।
चांग्या सोय धरी ज्ञान वटेश्वरी ।
मुक्ताई जिव्हारी बोध करी

## समाधिकाळ


ज्ञानदेवानी आळंदीस शके १२१८ साली दुर्मुख नाम संवत्सरी कार्तिक वद्य १३ गुरुवारी मध्यान्ह काळी जिवंत समाधी घेतली. या संबंधीची माहिती बऱ्याच लोकांनी लिहून ठेवली आहे. समाधि अभंग - नामदेव रायकृत, भक्तकथामृत सार -उद्धवचिद्धनकृत, संतलिलामृत-महीपतिकृत, भक्तकथामृत-नरहरी मालुकृत, ज्ञानेश्वरी विजय - निरंजनमाधव कृत. यापैकी मानदेवराय ज्ञानदेवाचे समकालीन, समाधि सोहळा प्रत्यक्ष पाहून त्याचे वर्णन केले आहे. हाच काळ इतर समकालीन संतानी पण दिलेला आहे. त्यामुळे नामदेव रायांचे अभंग विशेष महत्त्वाचे.

विसोबा खेचर -

शके बाराशे अठरा । दुर्मुख नाम संवत्सरा ।
गुरुवासर कार्तिक मासी ।
कृष्णपक्ष त्रयोदशी ।
माध्यान्हि दिनकर ।
राहे क्षण मात्र स्थिर ।
खेचर वंदि ज्ञानेश्वर ।
जोडोनिया दोन्ही कर ।

नामदेव -

धन्य अलंकापुर इंद्रायण तीर ।
देवसिद्धेश्वर नांदे तेथे।
पुण्यक्षेत्र ऐसे पाहुनीया आधी ।
घेतली समाधी ज्ञानदेवे ।
गणित बाराशते अधिक अष्टादश ।
कृष्ण कार्तिक मास त्रयोदशी
देव गुरुवार दुर्मुख संवत्सर ।
करिती सुस्वर पुष्पवृष्टी।
कृष्ण त्रयोदशी कार्तिक हा मास ।
बैसे समाधीस ज्ञानदेव
जाती हीन चोखा विनवी जोडूनी कर ।
समाधि निर्धार संजीवनी ।



समाधीकाळी ज्ञानदेव २१ वर्षे ३ महिने ५ दिवसाचे होते. ज्ञानेश्वरी ग्रंथ १५ व्या वर्षी लिहिला. त्याशिवाय अमृतानुभव योगवासिष्ठ टीका, चांगदेवपासष्टी, हरिपाठ व शेकडो अभंग इतकी ग्रंथ रचना अवघ्या एकवीस वर्षाच्या वयात केली. चांगदेवाला आपल्या पायाशी आणले, रेड्याकडून वेद वदविले, चलचाई करून जडभित चालविली. इत्यादि अद्भुत गोष्टी सहज लीलेने करून दाखविले. त्यांचे श्रेष्ठत्व आजही अक्षुण्ण आहे. ज्ञानेश्वर हे महाविष्णूचा अवतार मानले जातात. ते समकालीन सर्व संतांचे जणू आत्मा होते. त्या सर्वांच्या एकवटलेल्या प्रेमाची ती मूर्ति होती. त्यांच्या उत्साहाचा, आनंदाचा, प्रीतीचा ज्ञानेश्वर ठेवा होता.

ज्ञानेश्वर आनंदाचे आनंद, चैतन्याचे चैतन्य, प्रेमाचे प्रेम होते.

सेना न्हावी म्हणतात -

श्री ज्ञानराजे केला उपकार ।
मार्ग हा निर्धार दाखविला।

सुवर्ण आणि अलंकार मिळून एक सुवर्णच, चंद्र आणि चांदणे म्हणजे एक

चंद्रच, कापूर आणि परिमल म्हणजे एक कापूरच अथवा गोडी आणि गूळ म्हणजे एक गूळच त्याप्रमाणे देव आणि भक्त म्हणजे एक देवच.

ज्ञानेश्वरांनी मानदेवादि भक्तासमोर पांडुरंगास आपला मनोदय सांगितला. पांडुरंगाने त्याना कुरवाळले, नामदेव शेजारीच होते. ज्ञानदेव समाधि घेणार हे ऐकून त्याना महत् दुःख झाले. त्यांच्या नेत्रातून घळघळा अश्रूंचे पाट वाहू लागले.

दशमी प्रस्थान समयो । एकादशी जागर उसावो ।
द्वादशी क्षीरापती महोत्सवो । ज्ञानदेवे केला ॥

कार्तिक शुद्ध एकादशी पंढरीत तर वद्य एकादशी आळंदीस असा देवानी वर दिला. सर्वजण देवासह आळंदीस आले.

समाधीचे हृदय, द्रावक वर्णन नामदेवरायानी लिहून ठेविले आहे. त्यातील काही भाग.

जय जय शब्दे नामाबोभाये । केशव त्राहे त्राहणे ।

मी व्याकुळ होताहे । ज्ञानदेवा कारणे ।

तू रक्षिता सर्व जीवासी । तरी का दुःख आम्हासी ।

तू जवळी असता हृषीकेशी । ऐसी दशा हे प्राप्त ।

निवृत्तीनाथ देखील क्षणभर सुन्न झाले. नामदेव वर्णन करतात -

निवृत्ती नाथ -

बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट।

ओघ बारा वाट मुरडताती ।

बांधल्या पेंढीचा सुटलासे आळा ।

तृण रानोमाळ पांगलासे ।

माय बाप आम्हा त्या जिवले जेव्हा ।

ऐसे संकट तेव्हा झाली नाही ।

तेव्हा नामा म्हणे देवा पेटला हुताशन ।

करा समाधान निवृत्तीचे ।

एकादशीला नामदेवांचे कीर्तन झाले. पिंपळाच्या पारावर ज्ञानेश्वरांनी भक्तजनासह पारणे सोडले. केंदूरचे भगवद् भक्त त्यांचे दोन प्रहरी खिरापतीचे कीर्तन झाले. त्रयोदशीला तुळशी बेल आंथरून ज्ञानेश्वरांचे आसन तयार करण्यात आले. शिवाचा धवळा नंदी उठवून विवराची शिळा उघडली.

ज्ञानेश्वरांनी १०८ ओव्यांचे अखेरचे नमन केले. ज्ञानेश्वर महाराज समाधीकडे जावयास उठले. विठ्ठलानी कपाळी केशरी गंध लावून गळ्यात पुष्पहार घातला. नामदेव तळमळू लागले. समाधि स्थानाला प्रदक्षिणा घालून ते आत शिरू लागले. स्वतः विठ्ठलानी त्यांस हात दिला व प्रेमाने आत नेले. दुसरा हात निवृत्तीनाथांनी धरला दोघानी त्यास आसनावर बसविले -

ज्ञानदेव बैसले समाधि । पुढे अजान वृक्ष निधि ।

वामभागी पिंपळ आधी । सुवर्णाचा शोभत ।

निवृत्ती सोपान खेचर । नामदेव मुक्ताई निरंतर ।

हे उत्तर द्वारा समोर । बैसले जाहले ।

देव म्हणे ज्ञानेश्वरा । चंद्र तारावंव दिनकर ।

तंव तु समाधी स्थिरा । राहो दे निरंतर ।

जववरी हे क्षितिमंडळ । जववरी हे समुद्रजळ ।

मग कल्पक्षयी यथाकाळ । माझ्या हृदयी ठसावे ।

आणिक एक सोमारे । ज्ञानदेव ही अक्षरे । जो जपकरील निधारे । त्यासी ज्ञान होईल । ज्ञानदेव म्हणे सुखी केले देवा । पादपद्मी ठेवा निरंतर । तीन वेळा हात जोडून ज्ञानदेवानी डोळे मिटले.

शद्ब निर्मळे, विचार थकले, जे प्रणवाचे मूळ, जे योग द्रुमाचे फळ, जे आनंदाचे चैतन्य, जे आकाराचे पैलतीर जे बंध मोक्षाचे निर्वाण, असे परेच्या पलीकडचे जे शुद्ध स्वरूप तेच जे होऊन राहिले होते त्याना जागृतीतून समाधीत जाणे काय जड होते. त्यांची जागृतिच समाधी होती.

शके १२१८ कार्तिक व. १३ पासून शके १२१९ जेष्ठ पर्यंत सतत आठ महिने पांच नर रत्ने क्षणभंगूर मृत्यूलोक सोडून गेली त्याचा हा तपशील.

कन्हातीरी सासवड गांवी मार्गशीर्ष वद्य १३ दशीस सोपानदेवे देह ठेविला.

माघ व. ११, द्वादशीचे कीर्तन झाल्यावर त्रयोदशीस चांगदेवानी पुणतांबे इथे समाधी घेतली.

वैशाख वद्य द्वादशी, शके १२१९ या दिवशी मुक्ताबाई एदलाबादी गुप्त झाली.

जेष्ठ व. १२ त्र्यंबकेश्वरी निवृत्तीनाथानी समाधी घेतली.

ही सारी मंडळी जनतेच्या, जगाच्या कल्याण्यासाठी झटली त्यामुळे त्यांची स्मृती अद्याप जनमानसात कोरलेली आहे.

इति शम् । कल्याणं भवतु ।

(क्रमशः)

**शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे ४०० ६०२.

•••

## सौ. मेघना गोंजी यांचा गौरव

बांदोडकर महाविद्यालयातून २००३-०४ या वर्षात ग्रंथालय शास्त्राचा अभ्यास करून पदवी प्राप्त केलेल्या मेघना गोंजी यांना त्यांनी परीक्षेचा एक भाग म्हणून कै. नी. गो. पंडितराव वक्तृत्व स्पर्धेची ३५ वर्षांची सूची अतिशय मेहनतीने तयार केली. या प्रकल्पास त्यांना सर्वाधिक गुण मिळाले होते.

त्यांच्या कामाबद्दल १२ डिसेंबर रोजी नी. गो. पंडितराव वक्तृत्व स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभास समर्थ सेवा मंडळाचे श्री. अविनाश कोर्डे यांनी समितीतर्फे त्यांना भेटवस्तू देऊन विशेष गौरव केला.

एखाद्या वक्तृत्व स्पर्धेचा एवढ्या प्रधीर्घकाळाची सूची अशा निवेदनबद्ध पद्धतीने बनविली जाणे याचे हे पहिलेच उदाहरण आहे. प्रा. मोहन पाठक त्यांचे मार्गदर्शक होते. तर स्पर्धा समितीचे सचीव श्री अनिल हजारे यांनी त्यांना मोलाचे सहकार्य केले होते.

- संपादक

# डॉ. मो. दि.पराडकर यांचे आत्मकथन

भाग - ७

या सगळ्यात संस्थेसाठी मी मोठं आर्थिक नुकसान पत्करलं. अर्थात् याची जाणीव संस्थेला नव्हती आणि नाही असा माझा अनुभव आहे. तथापि सरकारच्या संमतीनं हायकोर्टामध्येच हे सगळं ठरलं होतं आणि म्हणून त्यांनी मला जून १९८० मध्ये पुन्हा रुजू व्हायला सांगितलं. मी रुजू झालो आणि नेहमीप्रमाणे कॉलेजचं काम सुरू झालं. वातावरण माझ्या इतक्या वर्षांच्या अनुपस्थितीमुळे बदललेलं होतं. आमचे अध्यक्ष भोगीलाल शहा - मूळचा चांगला माणूस. संस्थेसाठी स्वत:चे पैसे खर्च करणारा माणूस पण या मध्यंतरीच्या आमच्या कोर्टप्रकरणामुळे मी पुन्हा आपल्या जागेवर रुजू झालो, हा त्यांना अपमान वाटला होता. त्यामुळे निर्माण झालेला माझ्याविषयीचा आकस मला दिसतही असे. पण मी याकडे दुर्लक्ष करून माझं काम चालू ठेवलं होतं.



याकाळातच आमच्या डोंबिवलीच्या पेंढरकर महाविद्यालयातर्फे 'राम कापसे आज ते अंदमान निकोबारचे नायब राज्यपाल आहेत. माझं सुदैव की त्यांनी आजपर्यंत संबंध कायम ठेवले हे त्यांचे सौजन्य!' हे माझ्याकडे आले. त्यांनी सांगितलं की हे आमचं कला, वाणिज्य आणि शास्त्र महाविद्यालय आहे, त्याचं तुम्ही प्राचार्य व्हावं. ही गोष्ट १९८२ सालची. मी त्यांना सांगितलं की, 'तुम्ही मला बोलवताय ही चांगली गोष्ट आहे. पण मला असं वाटतं की तुम्हाला थोडा उशीर झालेला आहे. कारण मी आता इथे रुजू झालेलो आहे हे एक आणि सध्या तुमच्याकडे जे काळे नावाचे गृहस्थ प्राचार्य म्हणून काम पहातात, त्यांचे-माझे संबंध चांगले आहेत, तेव्हा त्यांना याच्यात वैषम्य वाटण्याचा संभव आहे. तेव्हा मी मुद्दाम हे कशाला स्वीकारू? पण राम कापसे त्यांनाही भेटून आले होते. त्यांनी मला सांगितलं की उलट काळे हे प्राचार्यपद सांभाळण्यापेक्षा तुमच्या हाताखाली उपप्राचार्यपद सांभाळायलाच तयार आहेत. त्यामुळे त्यांच्या नाराजीचा प्रश्न उद्‌भवतच नाही. पुन्हा मी म्हटलं की, अहो, मला आता फक्त दोन वर्ष उरलेली आहेत. मी ८५ च्या नोव्हेंबरमध्ये नियमाप्रमाणे सेवानिवृत्त होतो आहे. तेव्हा आता २ वर्षांत मी कॉलेजचं काय विशेष चांगलं करू शकणार? कारण एक वर्ष तर लोकांशी जमवून घेण्यात जाईल. रुळण्यात जाईल. तेव्हा तुमची अपेक्षा काय आहे ती आधीच सांगा. (मी हे सर्व मोकळेपणाने त्यांच्याशी बोलू शकतो कारण ते रुईया कॉलेजमध्ये माझे विद्यार्थी होते.) ते म्हणाले, आमची काहीही अपेक्षा नाही. खरं सांगायचं म्हणजे आम्हाला तुमचं फक्त नाव हवंय.

एक महाविद्यालय सोडून दुसऱ्याचे प्राचार्य व्हायचे असेल तर तांत्रिक बाबी पुष्कळ असतात आणि मी माझ्या कॉलेजच्या लोकांना तर आधी 'मी कॉलेज सोडणार असल्याचे' सांगणार नव्हतो. कापसे जव्हार भागातलेच होते. ते मला म्हणाले की, तांत्रिक गोष्टींची काळजी मी करू नये. तुम्ही मला फक्त हो म्हणा, बाकी सगळं मी पाहून घेतो. मग मी ते स्वीकारलं. मला पालघरपेक्षा डोंबिवली हे जाण्या-येण्याच्या दृष्टीने जवळही होतं. कापसे आमच्या संस्थेच्या अध्यक्षांशी स्वत:च बोलल्यामुळे त्या दृष्टीने माझ्याबाबत संस्था नाराज नव्हती. नाराजी होती पण ती पूर्वापार चालत आलेली आणि संस्थेने ओढवून घेतलेली नाराजी होती. सुदैवाने माझ्या कार्यकालात आमच्या कॉलेजचे रिझल्ट मात्र चांगलेच लागत होते. मला

आठवतंय की केसच्या वेळी कोर्टात आमच्या वकिलाने सांगितलं होतं की, अहो ते लक्ष देत नाहीत अशी जर प्रतिपक्षाची तक्रार असेल तर तुम्ही त्यांचे त्याबद्दल आभार माना. कारण लक्ष न देता जर ८०% च्या वर निकाल लागू शकतो तर लक्ष दिल्यास किती लागेल ? वस्तुत: माझ्या बाजूने निर्णय दिला गेला खरा, पण तो देताना जजनी थोडी हिशोबाची चूक केल्यामुळे माझा काही हजाराचा तोटा झाला. पण तो गौण विषय आहे !

मला निघताना तत्कालीन अध्यक्षांनी सांगितलं की आम्ही हे जे महाविद्यालय काढलं ते आमच्या प्रसिद्धीसाठी काढलं! आणि तुम्हाला कापशांसारखे गृहस्थ बोलवत असतील तर तुम्ही अवश्य जावं, हे आपलं व्यक्तिगत त्यांनी सांगितलं. मोकळेपणा मान्य परंतु यातलं वास्तव मात्र विदारक होतं.

त्यावेळपर्यंत महाविद्यालयाचा प्राचार्य नेमायचा तर एक समिती बसवावी लागत असे. त्या समितीमध्ये विद्यापीठाचा एक प्रतिनिधी असे; सरकारचा एक प्रतिनिधी आणि ज्या महाविद्यालयात मी जाणार, त्याच्या संचालक मंडळापैकी कुणी असे. मग त्यावेळी एक प्रश्न आला, तुम्ही प्राचार्य होणार हे खरं पण त्यावेळी अकरावी-बारावीलासुद्धा संस्कृत हा विषय महाविद्यालयात नव्हता. तत्कालीन संस्थेचे संचालक मंडळाचे अध्वर्यू अशोक प्रधान माझ्याबरोबर विद्यापीठात आले. प्रश्न असा होता की प्राचार्य म्हणून स्वीकारायचं तर मला विभाग कोणता द्यायचा? हिंदी विभाग मला देता येईल का, ही चौकशी करायला आम्ही विद्यापीठात गेलो. योगायोगाने मी ५१ साली साहित्यरत्न झालो होतो. म्हणून मी त्यांना तसं सुचवलं. मी अधिकृतरित्या हिंदी शिकवू शकतो का, एवढाच प्रश्न होता. सुदैवाने लोकांना तशी शंका नव्हती. विद्यापीठातल्या लोकांनी मग नियम वगैरे काढले मग मला म्हणाले, 'तुम्ही एका भाषेमध्ये पी.एच्.डी. आहात आणि पी.एच्.डी.पर्यंत अधिकृत मार्गदर्शकही आहात. दुसऱ्या भाषेमध्ये तुम्ही 'साहित्यरत्न' ही एम्.ए.च्या तोडीची परीक्षा उत्तीर्ण झाले आहात. तर हे दोन्ही लक्षात घेऊन आम्ही तुम्हाला बी.ए. (साधारण)पर्यंत शिकवायला अधिकृत परवानगी देतो. अशा रीतीने अध्यापकीय जीवनाच्या शेवटी मी हिंदी विभागाचा अध्यक्ष झालो !

अशा तऱ्हेने ऑक्टोबरात मी पेंढरकर कॉलेजमध्ये रुजू झालो. वातावरणामध्ये जो फरक असतो आणि एकंदर वागणुकीमध्ये जो बदल असतो तो मी अनुभवत होतो. या संचालकमंडळामध्ये एकतर सगळे लोक शिक्षणक्षेत्राशी संबंधित होते आणि योगायोगाने असे काही प्रसंग घडले की, माझं तिथलं स्थान बळकट झाले. प्राचार्य या नात्याने मला सगळ्याच विभागामध्ये जे लोक नेमले जातात त्या प्रक्रियेत सहभाग घ्यावा लागे. तो प्रशासनाचाच एक भाग होता. नेमणुकीसाठी मुलाखती मला सगळ्यांच्याच घ्यायच्या होत्या. आमचा विज्ञान विभागही असल्यामुळे रसायनशास्त्रासाठीही माणसं नेमायची होती. तत्कालीन विभागप्रमुख बाईंच्या विरोधात होते. मी प्रथम विभागप्रमुखांना विचारत असे की, एवढे एवढे अर्ज आलेले आहेत. त्यापैकी कुणाकुणाचा विचार तुम्हाला प्रामुख्याने करावासा वाटतो; आणि त्याची कारणंही द्या. तर आमचे हे रसायनविभागप्रमुख म्हणाले की, या दोन बाईंची पुनर्नेमणूक करू नये. मी म्हटलं असं पहा या दोघींचीही आपापल्या विषयात चार-पाच वर्षे झालेली आहेत. तुम्ही आता त्यांच्याऐवजी दुसऱ्याला नेमायला सांगता हा शैक्षणिकदृष्ट्या अन्याय आहे आणि संस्थेच्या दृष्टीने सुद्धा हे चांगलं नाही. कारण संस्थेला लोकांची सहानुभूती मिळायला लागते. संस्थेचे अध्यक्ष राव म्हणाले, we agree with this opinion. माझी व्यक्तिगत ओळख कुणाशीही नव्हती. मी फक्त संस्थेला हितावह धोरण राबवत होतो. तरी त्यातल्या एका बाईबद्दल त्यांनी (विभागप्रमुखांनी) तक्रार केली की त्या अनियमित आहेत.

मी म्हटलं तसं तुम्ही त्यांना सांगितलंय का? म्हणाले, 'मी सांगितलं पण त्यांनी लक्ष दिलेलं नाही.' मग मी म्हटलं, मग तुम्ही त्यासंबंधानं काही लिहून ठेवलंय का?' तर नाही म्हणाले. मग मी म्हटलं की तर मग हे सर्व वैयक्तिकच होतं. तेव्हा आता आपण मुलाखत घेऊ. नेमणूक करू आणि मग मीच तुमच्या वतीने या तक्रारीसंबंधाने त्यांच्याशी बोलतो. त्यांनी ते मान्य केलं. या शिक्षिकांशी मी जरी यातलं काही बोललो नसलो तरी आपली लोकशाही पद्धत असल्याने त्यांच्या कानावर हे सगळं गेलंच ! पुनर्नेमणूक झाल्यावर त्या मला भेटायला आल्या. म्हणाल्या, 'तुम्ही आमच्यासाठी एवढं केलंत !' मी म्हटलं, 'तुमच्यासाठी नाही. मी संस्थेचा पक्ष न्याय्य असावा म्हणून हे केलं.' तरी त्या म्हणाल्या, 'आजकाल असं कुणी करीत नाही. ओळख नसताना तर नाहीच नाही.' मी म्हटलं, 'ओळख असणं/नसणं याच्याशी या प्राचार्यांच्या औपचारिक जबाबदारीचा संबंध नसावा. तो मी आणू दिलेला नाही, जसे विभागप्रमुख माझे तसा तुम्हीही आमच्याच.' त्या बाई मला म्हणाल्या, 'मला तुमच्यासाठी काही करता आलं तर आनंद वाटेल.' मी मग त्यांच्या कानावर त्यांच्या विभागप्रमुखांची तक्रार घालून म्हटलं की, हे खरं की खोटं याची रुजवात मला करायची नाही. पण विभागप्रमुखांचं मत तुमच्याबद्दल असं असणं हे तुम्हाला केव्हातरी नडेल. आणखी दोन वर्षांनी मी खात्री देऊ शकणार नाही. तेव्हा तुम्ही ते सुधारावं अशी माझी अपेक्षा आहे. ती म्हणाली, 'आता अपेक्षा नाही; आज्ञाच आहे असं मी धरते.' 'व्यक्तिगत संबंध चांगले असावेत की नाही हा प्रश्न नाही, पण औपचारिक संबंधांमध्ये अशी आपल्याकडून चूक होऊ नये, अशी पुढे काळजी घ्या,' असं मी त्यांना म्हटलं. आज त्या निवृत्त होण्याच्या मार्गावर आहेत.

इतिहास विभागाच्या बाबतीतही अशी एक गोष्ट झाली. मुलाखतीला आलेल्या लोकांमधून ज्याला आम्ही मान्यता दिली तो मनुष्य ब्राह्मण नव्हता. आमचे इतिहास विभागप्रमुख जरा या बाबतीत आग्रही होते. स्वत: तो अभ्यासू माणूस. पण असे काही पूर्वग्रह असतात. मी त्यांना म्हटलं की, आपल्याला जे लोक उपलब्ध आहेत, त्यामध्ये हा माणूसच चांगला आहे. तेव्हा या माणसाला आपल्याला नेमावं लागेल. ते म्हणाले, 'अहो, हे वर्गात जाऊन काय शिकवतील?' मी म्हटलं, 'तुम्ही त्यांना सांगून त्यांच्या वर्गात एकदा जा आणि त्यांच्या व्याख्यानात काय काय त्रुटी आहेत त्या त्यांना सांगा. त्यांनी त्या दुरुस्त केल्या नाहीत तर बघू. पण या सर्वांची तुम्ही एक नोंद ठेवा आणि ती मला दाखवून ठेवा. मात्र एक पथ्य पाळा. त्यांच्या वर्गात जाताना तुम्ही परवानगी घेऊन जा. तसे न जाता गेलात आणि त्यांनी वर्गाबाहेर काढलं, तर मात्र मी त्यांच्या बाजूचाच आहे !

'अहो, एवढं कोण करणार?' मला हे विभागप्रमुख म्हणाले की, 'अहो ते शिक्षक काही ऐकायलाच तयार नाहीत. मग मी सूत्रं हाती घेतली. मी त्यांना भेटून त्यांच्या वर्गात येऊन मागच्या बाकावर बसण्याची परवानगी मागितली. मी त्यांना सांगितलं की तुम्ही शिकवताना जे फळ्यावर लिहिता ते शुद्ध आणि सर्वांना दिसेल इतक्या ठळकपणे लिहा. त्याप्रमाणे त्यांनी नंतर सुधारलं. मला त्यांचं पत्रही आलं.

आणखी एक गोष्ट. प्रा. राम कापसे यांच्या पत्नी तिथे मराठी विभागअध्यक्ष उमेदवार होत्या. त्यांनाही ५ वर्षे झाली होती. मराठी विभागाच्या नेमणुकीसाठी जेव्हा समिती नेमली, तेव्हा सरकारचे प्रतिनिधी म्हणून यादवराव गांगुर्डे होते. मुलाखत झाली. एका प्राध्यापकांना मी विचारलं की, बारा बलुत्यांबद्दल तुम्हाला काय माहिती आहे? ते म्हणाले, 'नाही. मला माहिती नाही.' असे मी त्यांना ज्याची माहिती हवी असे काही प्रश्न विचारले. मी सगळ्यांनाच असे प्रश्न विचारले. सगळ्यांच्या तुलनेत सौ. स्मिता कापसे यांनी फार चांगली उत्तरं दिली. प्रश्न खरा म्हणजे नाजूक होता, कारण ती कापसेंची पत्नी. पण

यादवराव गागुड्यांनीसुद्धा सांगितलं की, 'पराडकर, माझा सौ. कापसेंच्या नेमणुकीलाच पाठिंबा आहे कारण मला मराठी राहावं असं वाटतं ! मराठी टिकावं, असा विचार केल्यास अभ्यास हा करावाच लागतो. तो अभ्यास कापसेबाईंचा आहे. त्यामुळे मीच त्यांची शिफारस करतो.'

या नेमणुकांच्यामुळे मी काही सिद्धांतांनुसार चालणारा माणूस आहे हे या मंडळींना जे माहीत होतं ते अधिक दृढ झालं.

डिसेंबरमध्ये मला केरळहून बोलावणं आलं. केरळमध्ये एक समारंभ होतो पट्टथाण म्हणून. या शब्दाचा अर्थ विद्वानांचं स्थान निश्चित करणे. मला त्यांचं पत्र आलं. याला कारण आमचे डहाणूचे वकील करंदीकर. तर या करंदीकरांनी त्या लोकांना सांगितलं की, तुम्हाला संस्कृतमधून वेदान्तावर बोलणारा हवा असेल तर हाच माणूस योग्य आहे ! हा त्यांचा माझ्याबद्दलचा पक्षपात असं आपण धरून चालू !! ही गोष्ट मी अध्यक्ष राव यांच्याजवळ बोलून दाखविली. ते म्हणाले, पंचवीस गोष्टी सोडून तुम्ही याला जा. कारण हा तुमचा सन्मान आहे तुमची रजा-बिजा हा गौण विषय आहे. ते आपण नंतर बघू !

माझे काय एकेक योग बघा. २७-२८ डिसेंबरला आम्ही केरळहून परत येणार तो दिल्लीच्या विश्व हिन्दी संमेलनाचे विशेष अतिथी म्हणून बोलावलं होतं. त्यासाठी २९-३० तारखेला मला दिल्लीला जायला हवं होतं. म्हणून मी श्री. राव यांना म्हणालो की मी ऑक्टोबरमध्येच आलोय आणि संबंध नाताळ माझी सुट्टी होणार ! राव म्हणाले, 'जाऊ दे हो. तुम्ही त्याचा विचार करू नका. रजा वगैरे बाबी तांत्रिक असतात. तुम्ही जाऊन आल्यावर आम्हाला वृत्तांत कथन करा !' म्हणजे संस्थासंचालनामध्ये कसा फरक असतो ते मला अनुभवास आले. केरळच्या समारंभाचे वैशिष्ट्य असे होते की, केरळचा राजा झामोरिअन त्याच्या वंशजांकडे रहायचं. शृंगारलेल्या हत्तीने पाचारण केलेल्या पाहुण्यांना ओवाळायचं. पाहुण्यांनी मात्र धोतर नेसून अंगावर शाल घ्यावी, हे अपेक्षित होतं. ते मी पत्नीच्या उपस्थितीत केलं.

सुरुवातीची वीस-पंचवीस मिनिटं संस्कृतमध्ये बोलायचं आणि शंकराचार्यांच्या वेदान्तावर माझं व्याख्यान होणार होतं. मला विशेष असं वाटलं की माझं इंग्रजीतले व्याख्यान ऐकायला हजार लोक उपस्थित होते. कारण त्यांनी वेदान्ताची धर्माशी उत्तम सांगड घातली आहे.

सुटीनंतर मी कॉलेजमध्ये रुजू झालो. पण या प्रसंगात संस्थेने माझी कदर केली, असं मला वाटलं. योगायोगाने माझ्या त्या २ वर्षांच्या कारकीर्दीत सगळ्या शाखांमध्ये (Faculties) आमच्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा क्रमांक पहिला राहिला. आमचे शंकर वैद्य म्हणाले, 'तुम्ही काय जडीबूटी केली आहे? तुमचे विद्यार्थी आपले सगळ्यात पुढे !' मी म्हणालो, 'आहेत आमचे विद्यार्थी हुशार. त्यामुळे ते स्पर्धेत टिकतात.'

८४ साली प्रवेशाचा प्रश्न आला. हा दरवर्षीचा खरं तर प्रश्न आहे. दरवर्षी विद्यार्थ्यांची संख्या वाढते आणि तुकड्या वाढवणे संस्थेला नेहमी शक्य होतं असं नाही. मी संचालकांशी याबाबत काय करता येईल, अशी चर्चा केली. ते म्हणाले, 'आम्ही एक तुकडी वाढवण्याची परवानगी घेतलेली आहे. पण त्यातही १२० पेक्षा अधिक विद्यार्थी आपल्याला घेता येणार नाहीत. तर मी पालकांना ही गोष्ट मोकळेपणाने सांगितली. यात लपवण्यासारखे काही नाही. त्यातील समाजाचे जे दादा लोक होते तिथले, त्यांचा माझ्याशी संघर्ष आला. माझ्याशी म्हणजे मी प्राचार्य म्हणून ! ते मला म्हणाले, 'तुमची न्यायप्रियता ठाऊक आहे !' मी म्हटलं, 'आनंद झाला ऐकून. पण तुम्हाला ती जर खरंच ठाऊक असती तर पुन्हा समजावण्याचा प्रश्नच आला नसता ! ही गोष्ट संस्थेला शक्य नाही. तुम्हाला शक्य असेल तर बघा. तुम्ही संस्थेवर दडपण आणलं तर तुम्हाला

त्या विद्यार्थ्यांच्या बसण्याची आणि त्यांच्या एकूणच सोयी पुरवण्याची जबाबदारी घ्यावी लागेल. ती तुम्ही स्वीकारीत असाल तर माझं काहीच म्हणणं नाही !'

त्या वर्षी एकदा माझ्याकडे काही विद्यार्थी आले. नुकत्याच महाविद्यालयीन निवडणुका पार पडल्या होत्या. ते म्हणाले, 'तुमचं आम्ही अभिनंदन करायला आलो आहोत.' मी म्हटलं, 'का बरं? कशाबद्दल?' तर म्हणाले, 'अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे जे विद्यार्थी आहेत, ते बहुसंख्येने निवडून आले आहेत.' मी म्हटलं, 'यात माझं अभिनंदन करण्यासारखं काही नाही. अ.भा.वि.प. हा एक निराळा गट आहे असं मी मानत नाही. महाविद्यालयातले विद्यार्थी आपापल्या लोकसंग्रहानुसार निवडून येत असतात. अ.भा.वि.प.चे विद्यार्थी निवडून आले असं म्हणण्यापेक्षा मी असं म्हणेन की, पात्र विद्यार्थी निवडून आले. मी कुठली परिषद किंवा सेना मानत नाही ! आमचं सैन्य एकच. ते म्हणजे सर्व विद्यार्थी.' ते थोडेसे हिरमुसले होऊनच गेले.

स्नेहसंमेलनाच्या पहिल्या दिवशी काही विद्यार्थी फार गडबड करतात, असं माझ्या काही सहकाऱ्यांनी सांगितलं. मला पुढे म्हणाले, 'आपण पुरता बंदोबस्त ठेवावा.' मी म्हटलं, 'मी बंदोबस्त ठेवण्यास उत्सुक नाही. विद्यार्थ्यांना विश्वासात घेऊन मी सांगतो की, ते काही गडबड करणार नाहीत. समारंभ चांगला झाला. विद्यार्थी चांगलेच वागतात, असा माझा अनुभव आहे. त्यांच्यावर तुम्ही विश्वास टाकायला हवा.

माझ्या त्या काळात मी योजना अशी सुरू केली की संस्थेतर्फे सगळ्या शिक्षकांना स्वत:च्या संग्रहासाठी पुस्तकं घ्यायला अर्धी मदत संस्थेने करावी. अर्थात्, किंमत ठरवली होती आम्ही. संस्थेलाही हे फार पटले. आमच्या एका आग्रही सहकाऱ्यांनी मला सांगितलं की ही योजना आमच्या संमतीने झालेली आहे, असं तुम्ही संस्थेला भासवा.' मी म्हटलं, 'काय म्हणून? ही योजना मी आणली. मंडळींनी तिला पाठिंबा दिला.' मग यामध्ये काही मतभेद झाले आणि ते सरळ संचालकांपर्यंत पोहोचले. होतं असं. असंतुष्ट आत्मे सगळीकडे असतात ! पण त्या लोकांना अध्यक्षांनीच परतवून लावले !

ॲडमिशन म्हणजे प्रवेश देण्याची वेळ नेहमीच कसोटीची असते. काही लोक माझ्यावर रागावले, त्याचा परिणाम असा झाला की, मी कल्याणचा पास काढून ठाकुर्लीला उतरून कॉलेजच्या दिशेने येत असताना दोन लोक माझ्यावर चालून आले. त्यांना अर्थात माझ्याशी काही बोलायचं नव्हतंच, मला मारायचंच होतं. माझ्या बॅगचा त्यांना मला मारायला उपयोग झाला. मी तारेच्या कुंपणावर ढकलला गेलो आणि पडलो. योगायोगाने त्यांना असं वाटलं की, माझ्या मनात भीती निर्माण करण्याचं त्यांचं काम झालंय ! ते निघून गेल्यावर आमचा एक जुना विद्यार्थी आला आणि मला त्यांच्या घरी घेऊन गेला. मला कॉफी वगैरे दिली आणि पोहोचवायला तो आला. नेहमीप्रमाणे काम सुरू झालं. सुरुवातीचा पत्रव्यवहार पाहून झाल्यावर मी आमच्या काळ्यांना काय प्रकार घडला ते सांगितलं आणि थोडी विश्रांती घेण्याच्या इच्छा प्रदर्शित केली. काळ्यांनी डॉ. रावांना फोन केला. डॉ. रावांच्या डोळ्यात अश्रू आले. 'असे प्रकार होऊ लागले तर काय करायचं?' असं म्हणून त्यांच्या क्लिनिकमध्ये ते मला घेऊन गेले. मुका मारच बसला होता आणि विश्रांती घेणं हाच त्यावर उपाय होता. जीवशास्त्र विभागाचे आमचे प्रमुख डॉ. बागुल मला घरपर्यंत पोचवायला आले होते. स्वत: राव संध्याकाळी मला गाडी काढून भेटायला आले. तोवर बरीच गर्दी माझ्याकडे जमा झाली होती. लोकशाहीत हेच तर होतं ! बातमी लगेच पसरते ! आम्हाला मग काय झालं, कसं झालं हे सांगणं हेच एक काम होऊन बसलं ! डॉ. राव म्हणाले, 'तुम्ही पुन्हा रुजू व्हाल तेव्हा आम्ही तुम्हाला एस्कॉर्ट देतो. मी म्हणालो, 'ज्या वाटेने मी जात होतो, त्याच वाटेने जाणार आणि तसाच जाणार.' मग काही लोक

म्हणाले, 'एकदा पोलिसस्टेशनवर जायला हवं' मी म्हटलं, 'मी कशाला जाऊ? पोलिसांना जर वाटत असेल तर त्यांनी मला संरक्षण द्यावं !' मग संस्थेच्या वतीने काही लोक पोलिस स्टेशनला जाऊन या विषयात भेटले आणि मग मला लोकशाहीतील काटेरी वैभव (म्हणजे एस्कॉर्ट) लाभलं.

मी २-३ दिवसात पूर्ववत् काम करू लागलो. दडपणाला बळी पडलो नाही. तात्पर्य येन केन प्रकारेण मी अधिक प्रसिद्ध झालो.

पण काय योग असतात बघा ! ज्या गृहस्थाने हे सगळं केलं, पडवून आणलं त्याला चौकशीनंतर कैद झाली. पुढे तर त्याच्या एका प्रतिस्पर्ध्याने त्याला गोळी घातली. आश्चर्याची गोष्ट अशी की गावातले एक गृहस्थ मला हे सर्व सांगायला आले. मी म्हटलं, 'त्याला गोळी घातली,यात मला आनंद काय? मला मुद्दाम सांगण्याचं काही प्रयोजन नाही.' म्हणाले. 'नाही. तुम्हाला जरा बरं वाटेल.' मी म्हटलं, 'नाही त्याला अशी शिक्षा व्हावी, अशी माझी मनोमन इच्छा नव्हती.' याबाबत वेदांत खूप उपयोगी पडतो. माणसाच्या गुणदोषांकडे कसं बघावं हे तो शिकवतो !

१९८५ साली मी निवृत्त झालो तोवर कॉलेजचं नाव झालं होतं. अभ्यासामुळे झालं आणि या मारामाऱ्यांमुळेही ते सर्वतोमुखी झालं. माझ्या निरोपसमारंभामध्ये विद्यार्थी बरंच काही बोलले. मी नाहीतरी नेहमीच म्हणत आलोय की, विद्यार्थ्यांचे आणि माझे प्रेमाचे संबंध हेच माझं बलस्थान आहे. विद्यार्थ्यांत मी आपपरभाव केला नाही आणि माझ्या विशेष प्रेमाच्या विद्यार्थ्यांनाही वेळप्रसंगी शासन केलं, असे विद्यार्थीही माझी अजून आठवण काढतात. मला आपला मानतात. याचा अनुभव मला अनेक वर्षांनी विमानतळावर आला. आम्ही आमच्या एका सुनेला आणायला एकदा विमानतळावर गेलो होतो. तिथे आम्हाला पालघर महाविद्यालयाचा पुढे चिटणीस झालेला विद्यार्थी अधिकारी म्हणून झालेला भेटला. आम्ही काही त्याला ओळखलं नाही. पण त्याने आम्हाला ओळखलं आणि तिथले सगळे औपचारिक सोपस्कार पूर्ण केले. ते म्हणाले, 'मला पालघर महाविद्यालयाने माजी विद्यार्थ्यांच्या संघाचं अध्यक्षपद देऊ केलं होतं पण मी नवनीत भाईंना सांगितलं की मला ते नको. मला डॉ. पराडकरांनी शिक्षा केली, याचा मला अभिमान वाटतो.' काय विद्यार्थ्यांमध्ये कृतज्ञता असते बघा ! खरंतर स्तुती करण्यासाठी मी कधी प्रसिद्ध नव्हतोच. पण प्रथमपासून अध्यापकवर्गापेक्षा विद्यार्थीवर्गाचं माझ्यावर प्रेम जास्त.

डोंबिवलीत तसं शैक्षणिक वातावरण चांगलं होतं पण प्राध्यापक-विद्यार्थी या संबंधात सौहार्द एकूण कमीच. शैक्षणिकदृष्ट्या शेवटच्या म्हणजे बी.ए., बी.कॉ.मच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना माझं भाषण झाल्यावर विद्यार्थी मला म्हणाले, 'असं बोलणारे प्राचार्य कधी भेटलेच नाहीत.' मी म्हटलं, 'मला मात्र आजच्या कार्यक्रमात एक उणीव दिसली. ती अशी की कुठलाही विद्यार्थी आपल्या प्राध्यापकांबद्दल उत्स्फूर्त प्रेमाने बोलताना मला दिसला नाही. अभ्यासक्रम पार पडणं म्हणजे फार जुजबी झालं.याच्यापलीकडे जाऊन तुम्ही काय केलंत? या विद्यार्थ्यांच्या भाषणांमध्ये कुठेही मला भावनेचा स्पर्श दिसला नाही. निरोपसमारंभ हा बौद्धिक मिरवण्याचा समारंभ नाही. यानंतर ते विद्यार्थी खऱ्या अर्थाने जीवनात प्रवेश करणार असतात. अशा वेळेस त्यांना अशी खात्री वाटली पाहिजे की त्यांना कधी जर सल्ल्याची गरज भासली तर इथे यावं. प्राध्यापकांना विचारावं, असं चित्र दिसलं नाही. आमचे जीवशास्त्राचे प्रमुख हे उत्तम संगीताचे तज्ज्ञ आहेत. पण एकही विद्यार्थी आज असं म्हणाला नाही की, शिकताना-शिकवताना आमची अशी लय लागली की आम्ही चार भिंती विसरलो. आम्ही विषयात रंगून गेलो,

याचा अर्थ आमच्या कर्तव्यात आम्ही कुठेतरी उणे पडलेलो आहोत. शिक्षकांचं 'मार्गदर्शक' म्हणून काहीतरी स्थान आमच्या आयुष्यात आहे, असं कुणाच्या भाषणातून आढळलं नाही.' हे सर्व मी जाहीर भाषणात बोललो. आमचे उपप्राचार्य काळे म्हणाले, 'सर, आज तुम्ही जे बोललात ते बरोबर होतं. आम्ही फक्त विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम शिकवला. तो शिकवून त्यांना यश जरी मिळालं, तरी त्या यशाची चव किती राहिली, याची आम्हालाच शंका आहे.' लोकांना माझं बोलणं पटलं. डोंबिवलीत मी आजही गेलो तरी माझे काही लोकांशी व्यक्तिगत संबंध आहेत व ते राहतील कारण त्यात औपचारिकपणा नाही.

माझ्या अध्यापकीय जीवनाची सुरुवात तत्वत: १९४७ साली आणि व्यवहारत: १९४५ साली झाली. विद्यार्थ्यांचं मला लाभलेलं प्रेम हा मला मिळालेला ठेवा आहे. बहुतेक विद्यार्थी हे माझ्या कुटुंबाचे सदस्य असल्यासारखे वागतात. आमच्या सौभाग्यवती म्हणतात सुद्धा की तुमचे बरेच विद्यार्थी तुमचे भाट आहेत ! मी त्यावर म्हणतो की, हे पहा, मी काही त्यांना भाटगिरी करायला सांगितलेली नाहीत. मी काही स्तुती करीतनाही त्यांची. कौतुक मात्र करतो आणि योग्य ठिकाणी विद्यार्थ्यांचे कौतुक करणे हे शिक्षकाचे कामच आहे. नाही का? शिकणं आणि शिकवणं दोन्ही आस्थेचे विषय असले पाहिजेत, मग यशाची १००% हमी देता येते, हा माझा अनुभव.

डॉ. मो. दि. पराडकर

माहिम, मुंबई

## चुकीची दुरुस्ती

नोव्हेंबरच्या २००४ अंकाच्या संपादकीयात गीताजयंतीची तारीख ११/१२ देण्यात आली आहे. ती २२/१२ अशी आहे अनवधानाने झालेली ही चूक निर्दशनास आणून देणाऱ्या वाचकांचे आभार !

- संपादक

## सहवेदना



बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातील प्रयोग शाळा परिचर के. अे. सावंत यांचे अल्पशा आजाराने १० नोव्हेंबर, २००४ रोजी निधन झाले. कायम मदतीस तयार असणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते. १९७८ पासून ते रसायन शास्त्र विभागात सेवारत होते.

'दिशा' परिवारातर्फे त्यांच्या कुटुंबीयांच्या व सहकाऱ्यांच्या दु:खात सहभागी आहे.


- संपादक

# 'बृहदीश्वर (राजराजेश्वर) मंदिर', तंजावर

*भारतातील प्रसिद्ध कलाकृतींच्या परिचय मालेतील पुढील लेख. - संपादक*


चोल वंशाच्या इतिहासातील सर्वाधिक भरभराटीचा बिंदू राजराजाच्या कारकीर्दीत (इ.९८५-१०१८) गाठला गेला. इतर सर्व चोल राजांप्रमाणे हाही शिवभक्त होता. इ.स.१००० च्या सुमारास त्याने उभारलेल्या तंजावर येथील बृहदीश्वर (राजराजेश्वर) मंदिराच्या आडव्या पट्टीवर त्याचा एक शिलालेख आहे त्यात त्याच्या विजयी स्वाऱ्यांची नोंद आहे.


या मंदिराची माहिती घेण्यापूर्वी द्राविड मंदिराची रचना समजावून घेऊ. द्राविड प्रकारच्या मंदिरात गर्भगृह, अंतराळ मंडप व अर्धमंडप हे भाग असतातच तथापी या शैलीचे वेगळेपण त्या मंदिराच्या विमानातच प्रामुख्याने दिसून येते.




दक्षिण भारतीय देवालयाचे विमान

विमानाची रचना चौरस पायावरच केलेली असते. परंतु त्याचे शिखर उंच सूचीच्या (पिरॅमिडच्या) आकाराचे असते. उत्तरोत्तर वरील बाजूस कमी कमी होत जाणाऱ्या आकारांचे मजले एकावर एक बांधून त्याची रचना केली जाते. या मजल्यांना 'भूमी' असे म्हणतात. देवालयाच्या लहान मोठ्या आकाराला अनुसरून मजल्यांची संख्या ठरते. महाबलीपुरम येथील धर्मराज रथाला फक्त तीन मजले आहेत तर तंजावरच्या बृहदीश्वर मंदिराला तेरा भूमी आहेत. प्रत्येक भूमीवर चारी बाजूस अलंकरणासाठी लहान लहान मंदिरांच्या रांगा निर्मिलेल्या असतात त्यांना 'हार' म्हणतात. प्रत्येक भूमीच्या प्रत्येक कोपऱ्यावर संपूर्ण विमानाची लहान प्रतिकृती असते तिला 'कूट' म्हणतात. त्यांची शिखरे घुमटाकृती असतात व त्यावर कळस असतो. प्रत्येक भूमीवरील इतर लहान मंदिरांना 'शाला' असे नाव आहे. त्याचा पाया आयताकृती असतो. वर अर्धदंडगोलाकार छप्पर असते. निमुळत्या होत गेलेल्या शिखराच्या वरील भूमीवर 'ग्रीवा' नावाचा थोडा आत गेलेला भाग असतो. त्यावर गोलाकार किंवा अष्टकोनी आकाराचा 'स्तूपिका' नावाचा भाग असतो. नागर मंदिरातील आमलक व कळश याऐवजी येथे स्तूपिका असते. हे द्राविड मंदिराचे एक प्रमुख वैशिष्ट्य. या मंदिराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे गोपूर. मंदिराभोवती अंगणापलिकडे सर्व बाजूंनी एक भिंत बांधली जाते. तिला 'प्राकार' म्हणतात. या प्राकारातून मंदिराकडे जाण्यासाठी चारही दिशांना चार प्रवेशद्वारे असतात. या प्रवेशद्वारांच्या रचनेला 'गोपूर' म्हणतात. त्याचा 'अनुविक्षेप' (प्लान) आयताकृती असतो. त्याच्या तळमजल्याच्या मधून आत प्रवेश करण्याचा मार्ग असतो. तळमजल्याच्या वरील रचना सूचीप्रमाणे वर निमुळती होत गेलेली असते. या रचनेत अनेक मजले असतात. प्रत्येक मजल्यावर मंदिराच्या विमानाप्रमाणे लहान लहान मंदिरांच्या आकारांचा हार असतो सर्वात शेवटी अर्धदंडगोलाकृती





कूट आणि शाला




गोपूर

आडवे छप्पर व त्याच्या वरच्या बाजूस कलशांची एक रांग असते. ही गोपुरे मूळ मंदिराच्या शिखरापेक्षा खूपच उंच असतात. कांची येथील कैलासनाथ मंदिर, तंजावरचे बृहदीश्वर (राजराजेश्वर) मंदिर, मदुरेचे मीनाक्षी मंदिर ही द्राविड शैलीची सुप्रसिद्ध उदाहरणे होत.

**तंजावरचे बृहदीश्वर मंदिर** - या मंदिराची लांबी ५४ मी. व त्याच्या उत्तुंग शिखरासह उंची ५७ मीटर आहे. शिखर चौरस पायावर उभे असून ते पिरॅमिडच्या आकाराचे आहे. केवळ शिखरच १५ मीटर उंचीचे असून त्यावरील घुमटाकार स्तूपिका एकसंध दगडी आहे. तिचे वजन सुमारे ८० टन आहे. हा दगड वर बसवण्यासाठी मातीचा उतरता ४ मैल लांबीचा भराव घालावा लागला होता. या मंदिराच्या भव्य प्रमाणापेक्षाही त्याचा कलात्मक परिणाम अधिक महत्त्वाचा आहे. सभोवतीच्या मोकळ्या अंगणात या मंदिराचे उंच शिखर मोठ्या ऐश्वर्याने उभे आहे. एवढेच त्याचे वैशिष्ट्य नसून त्याची रचनाही अत्यंत सुंदर व प्रमाणबद्ध आहे. वरच्या स्तूपिकेची रुंदी त्याच्या पायाच्या १/३ आहे. शिखराच्या द्राविड पद्धतीच्या बांधणीत तेरा मजले (भूमी) आहेत. पण त्यांच्या आडव्या विभाजक रेषांमुळे शिखराच्या वर वर चढत जाणाऱ्या उंचीला बाध आलेला नाही. या घुमटाकार स्तूपिकेच्या चारी बाजूस चैत्य आकाराच्या कमानी. त्यावर नागांची नक्षी आणि कीर्तिमुख आहे. कीर्तिमुखाच्या आकृती शिखरावर व पायावर अनेक ठिकाणी पुनरावृत्त झालेल्या आहेत. त्याच्या तेराही मजल्यांवर वरील स्तूपिकेचा आकार लहान प्रमाणात पुन्हा पुन्हा उपयोजिलेला दिसतो. पल्लव वास्तूंची ही सर्व लक्षणे येथेही आढळतात. पायाच्या चबुतऱ्यावरील दोन आडव्या पट्ट्यात कोनाड्यांमध्ये देवदेवतांच्या सर्वतोरचित मूर्ती बसविलेल्या आहेत. महाबलीपुरमच्या रथमंदिरावरील ही रचना येथे घेतलेली आहे. या दोन पट्ट्यांच्या खाली सिंहाची तोंडे अपूर्ण अवस्थेत व त्याखाली एका रुंद पट्टीत वर उल्लेखिलेला राजराजाचा शिलालेख आहे. गर्भगृहासमोरील मंडपातला भव्य नंदी अखंड पाषाणाचा असून त्याची उंची ३१/२ लांबी ६ मी. व रुंदी २१/२ मी. आहे.

या काळातील दगडी शिल्प सृजनशील चैतन्याचे निदर्शक आहे. देवालयाच्या अलंकरणासाठी उपयोजिलेल्या या ठिकाणच्या मूर्तींपैकी प्रत्येक स्वतंत्र कलाकृती म्हणून मान्यता पावण्याच्या योग्यतेची आहे.



बृहदीश्वर मंदिराचे विमान
(शिखर)

हिंदू देवदेवता हाच त्यांचा मुख्य विषय आहे. तंजावरच्या बृहदीश्वर मंदिराच्या गोपुरावरील कोनाड्यात बसविलेल्या अशा मूर्ती कलापूर्णतेचा प्रत्यय आणून देतात. तांडवनृत्य करणाऱ्या शिवाच्या दगडी मूर्ती गतिमानता व घनतापूर्ण रूप या वैशिष्ट्यांनी परिपूर्ण आहेत. याच प्रकारची ब्राँझमधील जगप्रसिद्ध शिल्पे म्हणजे नटराजाची शिल्पे होत. गती व हालचाल, लय व तोल आणि तांडवनृत्यातील भाव दाखवण्यासाठी ब्राँझ हे अत्युत्कृष्ट माध्यम आहे. लयपूर्ण शरीरस्थिती व डावा पाय आणि हात यांचा विशिष्ट आविर्भाव यामधून अत्यंत प्रक्षुब्ध स्वरूपाची परंतु सहजसुंदर गति व हालचाल निर्मिण्यात मिळवलेले यश खरोखर असामान्य आहे.

- मंजिरी दांडेकर

# भावी शिक्षण

*शिक्षणाचा 'आकृतीबंध' बदलून आशय बदलत नाही. आकृतीबंधातील आशय बदलणे गरजेचे आहे त्या दृष्टीने मो. ह. विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक श्री. मनोरीकर यांचे हे विचार- संपादक*

आज स्वत:कडे पाहताना चटकन उठून दिसणारी औद्योगिक, आर्थिक व वैज्ञानिक तसेच अंतरिक्ष संशोधनातील प्रगती आणि गेल्या दोन दशकातील संगणकाची झेप थक्क करणारी आहे. मागील शतकाच्या बरोबरीची ! अंतरिक्ष संशोधनात तर प्रगत देशांनी डिवचल्याने आमची संशोधनातील पुण्याईच प्रगट झाली ! आपल्यासारख्या विकसनशील देशाला ही भरारी अभिमानास्पद व उत्साहवर्धक आहे. मात्र हे सर्व निवडक बुद्धिमतांनी घडवले आहे. सामान्यांच्या बाबतीत याचा एक अनपेक्षित व अपरिहार्य परिणाम असा झाला की, नोकरी ही गोष्ट आता पात्रतेने मिळवायची व स्पर्धेने टिकवायची झाली आहे. फक्त सर्टिफिकेटने मिळणारी व निवृत्ती, मृत्यू किंवा राजीनाम्यांवाचून न संपणारी राहिली नाही. म्हणजेच फक्त नोकरीसाठी मेकॉलेने सुरू केलेली शिक्षण पद्धती बदलायलाच हवी याचा हा संकेत आहे.

अल्पसंख्य इंग्रजांना भारतासारख्या तीस कोटी लोकसंख्येच्या देशावर राज्य करायचे होते. त्यांना असह्य वाटणारे उष्ण हवामान. त्यामुळे भारतीयांकडूनच शासन चालवणे भाग होते. ते हुशार ! त्यांनी मुळाशी हात घातला. आमच्या सर्व शिक्षणपद्धतीचे निरीक्षण करून त्यांना जरासुद्धा धक्का न लावता तिला संपवायचे ठरविले. मेकॉलेने त्याची शिक्षणपद्धती सुरू करून इंग्रजीचा एक गोंडस सुरा खुपसला. शिकणाऱ्यांना मार्क, प्रमाणपत्र, नोकरी व रोख सुरती रुपयात पगार ! ही एक नवी दारूच एक मोहिनीच अवतरली ! सगळे चकित व मुग्ध झाले. प्रामाणिकपणा, आज्ञाधारकता, परधार्जिणेपणा, अतिथ्यशीलता, वगैरे आमचे गुण त्यांनी हेरून ठेवलेच होते. त्यांना ते उपकारच होते.

प्रतिष्ठितांची मुले प्रथम या जाळ्यात पटकन घुसली. नोकऱ्या, पगार, मग सत्ता असे फासे आवळत चालले. इतके चांगले गुलाम, इतक्या स्वस्तात, आपण होऊन ! इंग्रजांचे कौतुक अशासाठी की, ही गुलामगिरी आमच्यावर लादताना जरा सुद्धा सक्ती नाही, आम्हाला कुठे विरोध नाही, कसली बंदी नाही ! कटुता नाहीच.

शिक्षण, गुण, इयत्ता, प्रमाणपत्र, नोकरी, पगार, प्रतिष्ठा, सत्ता या भूलभुलय्याने आम्ही इतके मोहित झालो की, हे सर्व त्यांना आमच्यावर राज्य करण्यासाठी स्वस्त, गुणी, विश्वासू व भरपूर गुलाम हवे होते म्हणून त्यांच्यासाठी होते, आमच्या हितासाठी नव्हे, असे आम्हाला वाटलेच नाही. स्वत्व थिजत होते, अस्मिता क्षीण होत होती, संस्कृतीचा ऱ्हास होत होता, कुटुंबव्यवस्था, अभिजात विद्या, श्रमप्रतिष्ठा, या सर्वांना वाळवी लागत होती, तरी आमचे विचारवंत पगाराच्या रुपयाच्या छनछनाटावर इतके मोहित, स्तंभित झाले की त्यांना स्वत्वाचा विसरच पडला. अगर आजपर्यंत ! आज सुद्धा आम्ही बाकी सर्व परंपरांसह बहुसंख्य मुलांना नापास करणारे इंग्रजी जरासे पहिलीपासूनच सुरू केले नाही तर इंग्रजी माध्यमात बालवर्गात, मोठमोठ्या देणग्या देऊन, अहमहमिकेने मुले कोंबतो आहोत. आता फक्त साक्षरतेसाठी इंग्रजी माध्यम व्हायचे बाकी आहे. होईल बहुतेक लौकरच ! जणू फक्त इंग्रजी माध्यमातून शिकल्याने ही मुले अफाट विद्वान्, म्हणजे डॉक्टर इंजिनिअर होऊन परदेशात जाणार आहेत ! तीच सर्वश्रेष्ठ परिणती आहे.

शक्यता, औचित्य यांचा तर विसर पडलाच पण परदेशात जाणाऱ्यांना कोणत्या परिस्थितीशी सामना करावा लागतो याचीही जाणीव नाही, इतके आंधळे झालो आहोत आपण याची लाजही वाटत नाही.

वास्तव अनुभव असा आहे की, इंग्रजी (परकी) माध्यमात बालवर्गात मुले ९८%, ९९% मार्क प्रथम सहज मिळवतात. धंद्याच्या बरकतीसाठीही त्यांची गरज आहे. पण परकी भाषा व अपरिचित विषयांतून, लेखन वाचनाचा वरवंटा कोवळ्या बुद्धीवर फिरला की दिवसेंदिवस ही भ्रामक टक्केवारी खाली येते व अपवादात्मक तीव्र बुद्धिमत्तेची मुले (ती थोडीच असतात) वगळता बाकीच्यांनी ग्रहणशक्ती पाचवी-सहावीत इतकी घसरते की, पुढे ती काही आकलनच करू शकत नाहीत. फक्त इंग्रजी बेदरकारपणे फेकू शकतात. विचार शक्तीचा, ग्रहणशक्तीचा लोप झाल्यावर येणाऱ्या आपत्ती काय सांगायला हव्यात ?

आणखी एक नवी रुढी; मुलांना पास होऊन वरच्या वर्गात आण्यासाठी पूर्वी अभ्यासाची गरज असे. आता असतेच असे नाही. ती पास होणे ही पालकांची, शाळेची, समाजाची, क्लासेसची, संस्थांची, शासनाची, अपरिहार्य गरज झाली आहे आणि हे सर्व मुलांना माहित आहे. शिवाय पास होण्याचे अभ्यासेतर अनेक मार्ग आणि त्यांचे दर हेही आता गौप्य नाही, अगदी पब्लिक सर्व्हिस कमिशनमध्ये सुद्धा ! वाघिणीचे दूध पिऊन आम्ही जी प्रगती केली आहे ती पाहून मेकॉले आपला पराभव सपशेल मान्य करून (जिवंत / शक्य असल्यास) आत्महत्या करील.

माध्यमाचाही दृष्टिकोन बाजूला ठेवला तरी शे. शंभरांना, ठराविकच, पुस्तकी, परिस्थितिनिरपेक्ष, उपयोगशून्य व क्रियाशून्य विषय अगदी दिल्ली मुंबईतील प्रसिद्ध शाळांना तसेच भामरागडच्याही वनवासी मुलांना तोच सक्तीने शिकून पास व्हायला लावणे, हा मानवी नैसर्गिक गुणवत्तेचा नुसता अपमान, उपमर्दच नव्हे तर अधिक्षेप म्हणून अपराध आहे हे आम्ही केव्हा मानणार? ही गुणात्मक परिणती हे वास्तव आहे व हे लौकरात लौकर कसे बदलता येईल याचा विचार करूया !

उद्या या पद्धतीच्या दोषाने पोळलेली, बेकारीने अगतिक झालेली मुले आपल्याला याचा जाब विचारतील तेव्हा आपल्याला, शासकीय रिवाजाप्रमाणे, 'हा विषय विचाराधीन आहे' 'याच्यावर समिती नेमलेली आहे.' एवढे तरी, - गेला बाजार - सांगता येईल, आले पाहिजे. पण अशी नुसती उडवाउडवी करण्यापेक्षा खरेच काही करणे योग्य नव्हे का?

'मानवी वृत्ती-प्रवृत्तींचा, विद्यमान परिस्थितीशी विधायक समन्वय करून जीवन प्रगत व सुखावह करण्याची क्षमता संपादणे' हा उत्तमोत्तम शैक्षणिक व्याख्यांचा ल.सा.भा.

यासाठी मानवी वृत्ती-प्रवृत्तींचे परिपूर्ण आकलन व त्यांच्या विधायक उन्नयनाच्या दिशा कळल्या पाहिजेत, वस्तुस्थितीचे यथार्थ ज्ञानही हवे. त्यांचा समन्वय होण्यासाठी ते, समाजाला स्पष्ट कळण्याइतक्या सोप्या व पारदर्शक रूपात मांडता आले पाहिजे. तसेच मानवी गुणवत्तेचे, क्षमतेचे शैक्षणिक प्रगतीसाठी नियोजन हा त्यचा पाया आहे.

इंडोनेशियाने हे, स्वतःची नवी भाषा निर्माण करून, पंधरा वर्षात, केले. इस्रायल दुसरा पुरावा आहे. यासाठी सामाजिक बुद्धिमत्तेतील सगळी विधायकता एकवटावी लागते.

एकदा एका मोक्याच्या वेळी अंतराळयान विषयातील अमुक एक तंत्रज्ञान, सहकार्य, आपल्या देशाला हवे होते. अमेरिकेकडे ते होते. मागणी केल्यावर (भारत प्रगत होईल या भीतीने) त्यांनी नकार दिला. तत्कालीन संशोधनप्रमुख ... अब्दुल कलाम यांनी आपल्या, सर्व

विद्यापीठे, यंत्रतंत्र महाविद्यालये व मोठमोठ्या खाजगी उद्योगसंस्था यांना एक उत्तम, प्रकट, प्रांजळ, आवाहन केले आणि काय चमत्कार ! गरज- अपेक्षेपेक्षा कितीतरी जास्त असा वैज्ञानिक, संशोधक यांच्याकडून प्रतिसाद मिळाला. स्वाभिमान, देशप्रेम, कर्तव्य भावनांच्या प्रेरणेने भारतीय प्रज्ञेच्या या 'सहवीर्यं करवाव है', वृत्तीने स्वावलंबनाने, स्वाभिमानाने अशी पातळी गाठली की अमेरिकेला चकित व खजिल व्हायची वेळ आली. हे सर्व स्वयंस्फूर्त, नवे, स्वतःचे, स्वदेशी, अनपेक्षित व उत्साहवर्धक होते. हेही घडू शकते, हा अनुभव आगळा होता हे विसरूया नको !

१८३५ साली आम्ही हतबुद्ध होतो. पण १९४७ साली? आपण स्वतंत्र होतो. इंग्रजांनी दीडशे वर्षात केलेल्या कितीतरी चांगल्या गोष्टी इथेच राहिल्या होत्या. त्या आता आपल्या होत्या. आपल्याला मदतीला आयत्या तयार होत्या. तेव्हा हे अगदी हसत-खेळत झाले असते. आज ते तेवढे सोपे नाही. पण उद्या आजच्याहूनही कठीणच होणार आहे याची जाणीव खूप काही करू शकेल. विद्यमान राष्ट्रपती त्याचे स्फूर्तिस्थान ठरावे.

**या विचारांचा पहिला आधार मुले**

गुणवत्ता, अनुकूलता, शक्यता, आवश्यकता, उद्देश यांच्या अनुषंगाने त्यांची वर्गवारी खालीलप्रमाणे असू शकेल. या वर्गवारीचा पाया पूर्वप्राथमिक विषयात पाहता येईल. ('शिक्षण पूर्व संस्कार व्यवस्था')

१) **बौद्धिक क्षमताप्रधान गट** - लेखन, वाचन, गणित, विज्ञान इ. बुद्धिगम्य विषयात अधिक रुचि / क्षमता असलेली मुले (गरज २५ ते ३०%) शैक्षणिक उपक्रम, शासन, न्यायालय, संशोधन, उद्योगांचे संचलन इ. बुद्धिप्रधान विषयांसाठी लागणारे मनुष्यबळ. याला लागणारी शिक्षण व्यवस्था विद्यमान अभ्यासक्रमात अपेक्षेनुसार असेल शिक्षणसंस्थांची संख्या १/४ झाल्यावर बाकी सर्व अडचणी दूर होतील. आज याच एका गटात सर्व मुले आहेत !

२) **बौद्धिक व शारीरिक क्षमता प्रधान गट** - दोन्ही क्षमतांची आवश्यकता. (गरज खूप मोठी ६० ते ७०%) : विद्यमान शिक्षण विषयांव्यतिरिक्त उद्योग, श्रम निर्मिती उत्पादन याविषयीचे विशेष आवड व क्षमता असणारी ही मुले कुठेतरी कोणत्यातरी क्रियात्मक उपक्रमात संलग्न असतील. यांचे औपचारिक (लेखन वाचनादि) शिक्षण गरजेनुसार त्या त्या परिसरात होईल. याचा आर्थिक भार औद्योगिक उपक्रम पेलतील. सोयीची, सुसूत्रीकरणाची जबाबदारी शासनाची असेल. विद्यार्थी गरजू असल्याने शैक्षणिक (नापासी) अपव्यय ०% असेल.

३) **शारीर बलप्रधान मुलांचा गट** - (गरज १५ ते २०%) श्रमसामर्थ्य व श्रमगौरव हे भांडवल. सर्व श्रमप्रधान उपक्रम - शेती, बागायती, कारखाने, अन्य उद्योगधंदे, यांचा हा गट आधार.

वरीलपैकी भाग एक साधारणतः लहान मोठ्या शहरात असेल. त्यासाठी कदाचित वसतिगृहे लागतील. माधुकरीचा पुनर्जन्मही उपकारक. दोन व तीन, मुख्यत्वे, ग्रामीण भागातच असतील. मुले बहुतेक आपापल्या घरी असतील. सर्व खेड्यांना रस्ते, बसेस वगैरे सोय होत आहे, झालेली आहे. उणिवा दूर करणे सोपे असेल. जरूर वाटणारे औपचारिक शिक्षण शिबिर पद्धतीने, सेवानिवृत्तांच्या सहाय्याने, गरज व सोयीनुसार वाजवी खर्चात होईल व तो उद्योगधंदे, स्था. स्व. संस्था इ. कडून सांभाळला जाईल. सुसूत्रतेसाठी किंवा संपर्कासाठी एखादी संस्था, वाहन ठेवून व्यवस्था करू शकेल. आकाशवाणी, दूरचित्रवाणी व त्यांच्या आवश्यक मुद्रण फिती (कॅसेटस्) मदतीला असतील.

मात्र शाळेत शिकून प्रमाणपत्र घेणारा पदवीधर वाव आपल्या क्षेत्रात निष्णात असणारा ग्रामस्थ शेतकरी, यामध्ये

उच्चनीचता नाही हे सार्वजनिक पातळीवर मुळापासून ठासून व ठसवलेले असायला हवे, तरच यश होईल.

या पुनर्रचनेत काही व्यवसायक्षेत्रे समवाय पद्धतीने यावी जसे खेळात (Play way) शिक्षण सोपे होते, तसेच काम करतानाही थिअरी व प्रॅक्टिस दोन्ही एकत्र नकळत पडत जातात. मेकॉलेची शिक्षण पद्धती यायच्या पूर्वी शिक्षण असेच होत होते. फक्त दृष्टिकोन असा नव्हता. वरवर पाहताना यात मागासलेपणा वाटेल, पण या पूर्वग्रहावर, अदूरदर्शित्वावर मात केली पाहिजे, बस्स !

स्थूल मानाने शैक्षणिक समवायासाठी व्यवसाय क्षेत्रे.

१) क्रीडा

$२^{१}/_{२}$-३ ते १५-२० वर्षे वयाच्या सर्व मुलांसाठी.

प्रत्येकाने लहानपणी (व किमान $२^{१}/_{२}$ वर्षे) क्रीडांगणात दिवसांतून काही तास व्यतीत करायलाच हवेत. खेळ, व्यायाम किंवा फक्त गप्पासुद्धा. खेळ, वयोगटानुसार पण प्रामुख्याने व्यायामप्रधान, सांघिक असावेत. सांघिक खेळ निवडताना, जागा, साहित्य, किमान पुरले पाहिजे. खेळाचा कालावधीही मिनिटांचाच हवा. त्यासाठी खो-खो, हुतूतू प्रमाण मानता येतील. प्रसंगी हॉकी, फुटबॉलसुद्धा! सर्व जास्तीत जास्त, खेळाडूंना सतत क्रियाशील ठेवणारे खेळ. मैदान सर्व वेळ चैतन्यपूर्ण हवे.

एक किंवा दोन किंवा गरजेनुसार शिक्षक, व्यवस्थापक असावेत, पहाटेपासून रात्रीपर्यंत मैदान जागते असावे. परिसरातील उपलब्ध जाणकारांना समाविष्ट करून त्याचा लाभ खेळाडूंना मिळावा. खेळांचे जास्तीत जास्त लाभ अपेक्षित असावेत. एशियाड, ऑलिंपिक यासारख्या संधीकडे दृष्टि असावी. संघप्रवृत्ती, सहकार्य, जिद्द, स्वाभिमान, समयसूचकता, चपलता, सोशिकता, खिलाडू वृत्ती, देशाभिमान, पराभव झेलण्याची क्षमता, खेळकरपणा इ. गुणरत्नांची क्रीडांगण ही खाण आहे.

क्रीडासाहित्य, व्यवस्थापन, स्वच्छता प्रसंगानुसार आरोग्य सेवा इ. त्याचे आर्थिक भाग आहेत. त्यांचीही उपेक्षा होता नये. सर्वांचीच मुले मैदानात येणार आहेत. त्यामुळे पालकांनी देणगी / वर्गणी देऊन किंवा विद्यार्थ्यांकडून फी घेऊन खर्च भागावा. स्था. स्व.संस्था, शासन, उद्योगपती, यांचा संपर्क असावा. अडीनडीला आर्थिक भार शासनाचाही असावा.

उद्योगाला सुद्धा इथे भरपूर वाव आहे. क्रीडा साहित्य पुरवणे, मैदाने अद्ययावत राखणे, खाद्यपदार्थांचा पुरवठा, औषधे, पुस्तके, कपडे शिवणे, पुरवणे, वाहतुक इ. परिसरातील मोठी मुले ही जबाबदारी पाळून व्यवसाय, शिक्षण व आपल्या लोकांशी संपर्क राखून घरच्या घरीही उद्योग करू शकतील. उद्योगाने संबंधितांशी बांधिलकी राखतील.

२) पशुपालन

ग्रामीण भागात पशू हे 'पशूधन' असते. पूर्वापार, भरलेला गोठा हे वैभव मानले जाते. त्याला आता कुक्कुट पालनाची आणखी एक जोड गोठे, स्वच्छता, आरोग्य, मूलमूत्राचा विनियोग, दूधदुभते, दुग्धशाळा, व्यवस्थापन नाशिवंत पदार्थांची साठवण, रुपांतराने टिकवणे, आगरकता इत्यादींमध्ये कितीतरी प्रकारे कर्तबगारीला उद्योगाला वाव आहे. तो अमर्याद आहे. मलमूत्रांतून होणारी उत्पादने चारा निर्मिती व वाहतुक वगैरे आणखी एक पैलू.

३) शेती-बागायती

अन्नधान्ये, कडधान्ये, आर्थिकपिके (Cash Croft), फळबागा, भाजीपाला, मसाल्याची झाडे इ. यांना सामावणारा हा विषय. आज शासनही फळबागांना उत्तेजन, अनुदान देत आहे. मात्र त्यात कर्तबगारीला अजून भरपूर वाव आहे. पाणी अडवा, पाणी जिरवा उपक्रम जितका वाढेल तितका फळबागांचा विस्तार वाढेल. द्राक्षे, संत्री,

डाळिंबे, केळी, आंबे, फणस, अननस, काजू, सुपारी, नारळ, सफरचंद, अंजीर, आवळे इ. नावे घ्यावी तेवढी थोडी, इतका हा व्याप. हे उपक्रम शैक्षणिक दृष्टिकोनाची जोड देऊन हाताळले तर ते किती तरी विकसित व विकासक होतील. इस्रायल, चीन वगैरे देशांनी प्रतिकूलतेवर मात करून यात नवे, आपले आदर्श चित्र निर्माण केले आहेत. गंगा, कावेरी प्रकल्पही मूळ धरतो आहे. खूप वेळ लागेल पण जेव्हा पूर्ण होईल तेव्हा डोळे दिपून जातील. त्या दिवसाच्या स्वागताची तयारी औद्योगिक शेती उत्पादनांच्या प्रकल्पानीच होणार आहे.

मसाल्याच्या पदार्थांच्या झाडांची लागवड आता सुरू झालेली आहे. कृषिविद्यापीठांनी त्यांचा शास्त्रीय, आर्थिक, व्यावहारिक पातळीवरून बराच अभ्यास केला आहे. त्याचा चांगला लाभ होणार आहे. कोकणातल्या दमट हवेतील नारळ, सुपारी, केळी, अननस, आंबे, काजू, घाटावरच्या कोरड्या हवेतही रुळताहेत. कोकणातही बटाटे, शेंगदाणे, ऊस ही पिके होऊ शकतात हे श्री. गजाननराव तिरोडकर (आता M.G.T. फौंडेशन) यांनी सिद्ध केले आहे. असे सर्व अनुभव एकत्र करणे हा एक शैक्षणिक प्रकल्प होईल. उद्यम, शेतकरी, या मासिकांनीही खूप मोठी बैठक तयारी केलेली आहे. राळेगणसिद्धिला पू. अण्णा हजारे यांनी एक नवे परिमाण निर्माण केले आहे. अशा व यासारख्या सर्व उपकारक साधनांचे संकलन करून समाजापुढे मांडणे हे शिक्षणाचेच काम आहे. हा शिक्षणोद्योग समन्वय आहे.

फळ बागायतीतून निर्माण होणारी फळे वितरण करणे, टिकवणे, रुपांतरित करणे, पेठेत गिऱ्हाईकासमोर सादर करणे इत्यादी हा सर्व औद्योगिक, व्यापारी भाग. या सर्व उपक्रमात पालक कर्ते असतात तिथे त्यांचे पाल्य किंवा त्या विषयांचे विद्यार्थी त्यांच्याबरोबर हातभार लावताना सर्व कौशल्ये प्रात्यक्षिकांसह आत्मसात करतील. वयात यायच्या पूर्वी व्यवसायात तरबेज होतील, एकही दिवस शाळेत न जाता, एकही इयत्ता न शिकता, मार्क सर्टिफिकेट यांच्याशिवाय !

आतापर्यंत नारळाच्या काथ्यावर बराच विचार व प्रयोग पडले आहेत. काजूच्या बोंडाचे सरबत गोपुरी आश्रम (कणकवली) यांनी सुरू केले आहे. फणसाचे, कोकमाचे, आंब्याचे पीक पावसाळ्याचे आरंभी तयार झाल्याने वाळवता न आल्याने वाया जाते. फणसाच्या आठोळ्या, शेंगदाण्याच्या तोडीच्या फक्त योजक/कर्त्या अभावी कुजून जात आहेत. तसेच नारळ, पोफळी, केळी यांची झापे, पाने यांचा, बांबूच्या त्याज्य भागाचा, कागद निर्मितीसाठी उपयोग होणार आहे. हा भाग अजून पूर्णपणे दुर्लक्षित आहे.

**४) औषधी वनस्पती**

एकूण उपलब्धपैकी ६५% जमीन वरकस आहे. वरकस जमिनींचा उपयोग हा बरेच दिवस प्रश्नचिन्हांकित विषय. पण आता 'नास्ति मूलम् अनौषधम्' चा अर्थ नव्याने कळू लागला व औषध कारखानेही मागणी करू लागले.

आयुर्वेदाने यावर खूप सखोल अभ्यास केलाय. पण मध्यंतरीच्या अंधारयुगात दिपलेल्या डोळ्यांना ते पाहण्याची गरजही वाटली नव्हती. त्यामुळे आता तो अभ्यास मुळातून करावा लागतोय. केशव सृष्टीने औषधी वनस्पतींवर महत्वाकांक्षी प्रकल्प चालवला आहे.

ब्राह्मी, तुंबा, टाकळा, आघाडा, माका, दुर्वा, बेल, तुळस, उपरसाळ, अमरवेल, धोत्रा, अडुळसा, कुडा, आवळा, हरडा, कडुलिंब वगैरे सर्वत्र आपोआप वाढणारे, विपुल असणारे, रानटी, गवत म्हणून ठाऊक असलेली नावे. कित्येक वनस्पती अमृत व कित्येक विष. जसे जीवांना तसे रोगांनाही. ही अमोल, अमोघ निसर्ग निर्मित दिव्य औषधी शक्ती आपण अज्ञानामुळे पायदळी तुडवतो आहोत. ही उपेक्षा थांबवा म्हणून त्या टाहो फोडत असतील! आपण आतातरी ते ऐकूया !

या सर्व औषधी वनस्पतींची निश्चित ओळख, जोपासना व औषधी कारखान्यांना कच्चा माल म्हणून

मागणीनुसार पुरवठा करणे, हा केवढा प्रचंड व्याप आहे ! जितके मनुष्यबळ मिळेल तितके हवे. वनवासी विभागात सुद्धा हा उपक्रम जोपासता येतो. शिक्षणही होते, उद्योग-उत्पादनही होते. भांडवल, परिश्रम ! ते मात्र हवेतच. इथे इयत्ता, मार्क, सर्टिफिकेट कशाचीही गरज नाही किंवा किंमत नाही.

आमच प्राचीन विद्यापीठे, समृद्ध ग्रंथालये व विद्या केंद्रे आक्रमक नरपशूंनी जाळून, लुटून, तुडवून उद्ध्वस्त केल्यावर काही शतके आपल्याकडे विद्यापीठे वगैरे नव्हती. पण विद्या होती. ती मुखोद्गत स्थितीत प्रयत्नपूर्वक जिवंत राखली जात होती. मेकॉलेने इंग्रजी, इयत्ता, मार्क, सर्टिफिकेट या गोष्टी १८३५ पासून आणल्या. ही सर्व सोय त्यांच्यासाठी होती. अल्पसंख्य दूरच्या, परक्या राज्यकर्त्यांना ३० कोटींच्या प्रचंड देशावर राज्य करायचे होते. ते हुषार ! त्यांनी देशांतील शैक्षणिक स्त्रोतांची पाहाणी केली व थंड डोक्याने, चाणाक्षपणे, आमच्याही नकळत आमच्याकडूनच ते नष्ट केले. त्यांच्या शिक्षण पद्धतीच्यापुढे त्यांना नोकरी व पगार जोडले. आम्ही इंग्रजांना देवदूत व इंग्रजीला देववाणी मानून धावत जाऊन मिठी मारली. ती आजपर्यंत ! कुठेही कोणतीही सक्ती त्यांनी केली नाही. आज मेकॉलेकडून त्याबाबतीत बरेचसे शिकण्यासारखे आहे.

**नियोजन - सर्वस्वी उपेक्षित पण अत्यंत मौलिक आवश्यक**

उगवते मानवी सामर्थ्य व देशाची स्थलकाल परिस्थितीनुरूप संपत्ती व गरज यांचा समन्वय करणारे नियोजन करून सुरुवात करूया. देशाला न्यायाधीश किती हवेत, तत्वज्ञ, शिक्षक, शास्त्रज्ञ, डॉक्टर, यंत्रतंत्रज्ञ वगैरे संख्येने किती हवेत हे ठरले की शाळा, महाविद्यालये, विषय याचे स्वरूप संख्या रुपरेषा निश्चित होईल. विषयांनुसार मुलांची संख्या व त्याला अनुसरून शिक्षक, प्रशिक्षण इत्यादी. (विद्यमान शिक्षक संख्येच्या किमान पाच पट प्रशिक्षित शिक्षक बेकार आहेत. तरीही प्रशिक्षण महाविद्यालयातील प्रवेश लाखो रुपयांना विकतही घेतला जातो आहे म्हणे ! चूक भूल देणे घेणे) गरजेइतकीच माणसे शिक्षित व उपलब्ध झाली की मग बेकारीचा राक्षस उपाशी मरून जाऊ दे ! अगदी कंप्यूटर शिक्षणात सुद्धा !

आजवर शिक्षण विषयासाठी समित्या नेमल्या गेल्या. त्यात एक तर डॉ. राधाकृष्णन् यांच्या अध्यक्षतेखाली होती. पण कार्यक्षेत्र 'विद्यमान चौकट'. सर्वांना यायलाच पाहिजे असे, एक नव्हे, सात विषय. त्यातच जास्तीत जास्त मुलांना हमखास नापास करणारे इंग्रजी व गणित. अगदी मुंबई दिल्लीपासून वनवासी मुलानाही तेच, तसेच ५०% मुले नापास होण्यात आम्हाला जरासुद्धा दुःख, खंत वाटत नाही. मा. मधुकरराव चौधरींनी एकदा, ते शिक्षण मंत्री असताना, विधानसभेत द्विस्तरीय (सामान्य व उच्च) अभ्यासक्रमाचा प्रस्ताव ठेवला. तुम्ही हा XX च्या फायद्यासाठी मांडलाय असा हेत्वारोप करून आमदारांनी तो चर्चेलाही येऊ दिला नाही. (तेव्हा किती आमदार महोदय निरक्षर होते हे एकदा सवडीने, गंमत म्हणून पाहण्यासारखे आहे.) (वरील फुल्यांच्या जागी 'भट' शब्द होता.)

घटनेनुसार कोणालाही विषय कोणत्याही पातळीपर्यंत शिकण्याचा हक्क आहे. पण अपव्य हे, कुणाचेही असो, नुकसान आहे. हे अशा संदर्भात निदान शासन / प्रशासनानेतरी विसरू नये. अपव्ययाचा हक्क घटनेत नाही.

१९८५ मध्ये पंतप्रधान राजीव गांधींनी, शिक्षण विषयात काही सूचना असल्या तर, मागवल्या होत्या. एक सहकारी, आमच्या कनिष्ठ महाविद्यालयातील डॉ. जोशी, NCERT वर सभासद होते. त्यांच्यामुळे हा विषय मी तेव्हा लिहून NCERT ला पाठवला होता. प्रथम मी तो प्राचार्य नाडकर्णी (डॉ. आनंद नाडकर्णींचे वडील) यांना दाखविला. वाचून म्हणाले, ''तुम्हाला पन्नास वर्षांनतरचे

चित्र दिसले आहे. मात्र ते भ्रामक ठरण्याची भीती आहे. कारण, हे प्रयोगाने सिद्ध व्हायला हवे व त्यासाठी समाजाने मुले दिली पाहिजेत.'' अर्थातच पालकांनी तयारी आधी व्हायला हवी. मग प्रयोग सुरू होईल व ती मुले पालक झाल्यावर तो पक्का होईल. हे त्यांना स्वच्छ दिसले होते.

विद्यमान परिस्थितीत इतका मोठा सार्वत्रिक बदल, समाजाच्या अंगवळणी पडायला खूपच प्रयत्न करावे लागतील. प्रथम विचारवंतांनी दूरदृष्टीने तो चर्चेला घेतला पाहिजे. शंका, आक्षेप, सूचना काही असतीलच त्यातून पूरक त्या निवडायला हव्यात आणि अंतिम रूप 'सर्वेषाम्' नसेल तरी 'बहुसंख्यनाम् अविरोधेन'च-व्यवहार्य होईल. कदाचित जागतिक पातळीवरील पाहाणीही उपकारक / आवश्यक होईल.

या उपक्रमात सर्वात महत्त्वाचे दोन मुद्दे - १) विषयावर वर्गवारीला जुळणारी मुलांची वयाच्या ६ व्या, ७ व्या वर्षी वर्गवारी व २) ही वर्गवारी स्वीकारणारे पालक, दोन्ही गोष्टी सोप्या नाहीत. पण अशक्यही नाहीत. मुलांची वर्गवारी करणारी कसोटी पारदर्शक, सर्वसमावेशक, तर्कशुद्ध, शास्त्रशुद्ध, क्रियात्मक, लेखनवाचन निरपेक्ष, अंगभूत गुणवत्ता, वृत्ती-प्रवृत्तींना अनुलक्षून, पालकांच्या सहकार्याने, सर्वांसमोर, निर्विवाद, निःसंशय, निःपक्षपाती, एकूण सर्वांसाठी असल्याने सोपी असेल तर ३/४ यश आले.

अशी वर्गवारी झाल्यावर तदनुसार ही मुले ज्या ठिकाणी सामावायची ती पाहणी व व्यवस्था नियोजनपूर्वक झालेली असायला पाहिजे. क्षमतेनुसार प्रत्येक मुलाला काही पर्यायही असतील. गुणकर्मानुसार ते होईल. हे कायम चालू राहिल.

नियोजन मंडळ इथे नियोजनातून समन्वय करील. कोणकोणत्या क्षेत्रात किती मुले कोणत्या क्षमतेची असावीत ते ठरवील. मुलांची क्षमता व कल पाहून त्यांना त्या त्या ठिकाणी पाठवता येईल. शक्यतो मुले आनंदी राहतील अशी दक्षता असेल आणि जसजशी हितकारकता उपयुक्तता पटू लागेल तसतसे पुढे सोपे होईल.

ही सर्व व्यवस्थित समाधानकारक जुळवाजुळव होताना व झाल्यावरही, प्रसिद्धी, चर्चा, उहापोह, होत राहिलाच पाहिजे. प्रसार माध्यमे इथे खूप मोठा मौलिक सहभाग देतील. सर्व पालकांसमोर या सर्व क्रिया पारदर्शकपणे व त्यांच्या सहकार्याने घडलेल्या असल्याने विवंचना कमी होईल. परिस्थितीनुसार आंच त्यांनाही आहेच. नोकरी विषयात आज जाणवणारा दाहक अनुभव पुष्कळ मदत करील. फक्त सामान्यांची दृष्टी जागवायला हवी.

पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे मुलांच्या दुसऱ्या व तिसऱ्या गटांना, भाषा, गणित, भूमिती, शास्त्र वगैरे विषयांची वेळपरत्वे गरज भासणारच आहे. ती, शिबिरे भरून, कॅसेट करून, वगैरे द्वारे तसेच आकाशवाणी, दूरदर्शन याद्वारे भागवली पाहिजे. त्याला येणारा खर्च स्थानिक उद्योगधंदे, स्था. स्व.संस्था देणगीदार, यांनी सांभाळायला पाहिजे.

### शिक्षणपूर्व संस्कार व्यवस्था -

नोकरी संस्कृतीने एकत्र कुटुंबव्यवस्था राहिली नाही. तिसऱ्या पिढीकडून घरच्याघरी एकत्रपणे होणारे संस्कार लोपले. आईवडिल अननुभवी म्हणून 'पूर्व प्राथमिक' शिक्षणाचा जन्म झाला. बागडायच्या, हुंदडायच्या, खेळायच्या, खोड्या करून कौतुक करून घ्यायच्या, रम्य बालपणात, केजी वर्ग आले. प्रचंड फी व महागडे डौलदार गणवेश यामुळे पालकांनाही 'आपण मुलांसाठी खूप (खर्च) करतो'चे समाधान मिळाले. पण त्या मुलांच्या कोवळ्या मेंदूवर लेखन वाचन (आणि अलिकडे तर इंग्रजीतून !) अत्याचार करू लागले. प्रा.रा.म.जोशींच्या समितीने पाहणी करून अहवाल शासनाला सादर केला, शासनाने जशाचा तसा स्वीकारला. पण हाय ! वाटेतच कुठेतरी..

ईश्वर त्याला सद्गती देवो ! मात्र हे उपक्रम होते तसेच राहिले. त्यातल्या संस्कारांच्या अभावावर इलाज म्हणून (आपण नव्हे पण) अमेरिका (काही राज्ये) व जपान यांनी पहिल्या व तिसऱ्या पिढीचा संपर्क राहिलाच पाहिजे असे ठरवून सुरुवात केली आहे.

नव्याने निर्माण परिस्थितीत उभयताना (पतिपत्नी) नोकऱ्या बहुतेक नसणार आहेत. त्यामुळे ती मुलांच्या दृष्टीने सोय. प्रयत्नपूर्वक शहरी जीवनात सोसायटी, चाळ, वाडी, मोहल्ला, संकुले, यांच्यात एक समाजगृह - संस्कारकेंद्र असेल, स्थानिक किंवा जवळपासच्या सक्षम / उत्सुक सेवा निवृत्त व्यक्ती, खेळाडू, कलावंत वगैरे या सर्वांनी सोयीसवडीनुसार, जमणाऱ्या सर्व मुलांबरोबर आविष्कार करायचा. ही मुले २-२॥ ते ६-७ वर्षाची असतील. रोज ५-६ तास ४-५ वर्षे एकत्र, हसतील, खिदळतील, खेळतील समोरे आलेल्या कला, विद्या, आवडी-निवडीनुसार आत्मसात करतील, गातील, नकला करतील, गोष्टी सांगतील, कसरती करतील, प्रश्न विचारतील, झाडे वाढवतील. साफसफाई करतील, चित्रे काढतील, यंत्र तंत्रातील मोडतोड करतील, आवड जोपासतील, अभिनय करतील, खोड्या काढतील अगदी स्वच्छंदपणे ! यातूनच नमस्कार, पाठांतर-परवचा, रामरक्षा, मनाचे श्लोक, आरत्या, विविध सूत्रे, अमरकोष, भगवत गीता, गीताई, अभंग, पवाडे, ईशावास्य अशा विविध मौलिक गोष्टी त्यांच्यासमोर येतील. आवडी-निवडीनुसार रुजतील व पुढे वर्गवारीत खूप उपकारक होईल. हा सर्वांगीण विकास असल्याने, दिवसातून ४-६ तास तरी पालकांनाही एक आनंदकेंद्र असेल.

पूर्वी आपल्या मोठ्या कुटुंबात असेच असायचे. खेड्यातील वाड्या, आवाठ, वस्ती, गाव, जमेल तिथे असे करता येईल, करायला हवे. काही वेळा सहलीद्वारे ग्रामीण वा शहरी जीवनाचे परस्पर दर्शन घडवता येईल. सहिष्णुता, सांघिकता, सोशिकपणा, आज्ञाधारकता, आत्मीयता, गुणग्राहकता, चपलता, समता, सौजन्य या सर्व गोष्टी न शिकवता आत्मसात होतील. ही गुणसंपदा या वयात रुजवली तर पुढच्या पिढ्यांचे जीवन आजच्यापेक्षा कितीतरी समृद्ध होईल ! विशेषत: 'एक या दो'च्या परिस्थितीत किंवा अपंगत्वाच्या समस्येतसुद्धा !

या सर्व उपक्रमात व्यवस्थापन, साहित्य इत्यादी गोष्टी आर्थिक खर्चाच्या आहेत. विशेषत: व्यवस्थापन, क्रीडासाहित्य खरेदी व जोपासना, मुलांना खाऊ, स्वच्छता, प्रसंगी औषधोपचार, हा खर्च खूप मोठा नाही पण किरकोळही नव्हे.

सर्वांचीच मुले इथे लाभधारी असणार असल्याने सर्वांनी वर्गणी काढून, व्यवस्थापनात शक्य त्यांनी स्वत: सहभागी होऊन हे घडेल. एकोपा टिकायला सहायक असेल. स्था. स्व. संस्था, शासन, काही अनुदान देईल आणि प्रामुख्याने त्यांचे जागरूक नियंत्रण असेल. मार्गदर्शक असेल, प्रोत्साहन असेल.

उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ नोकरी या सूत्रात बदल एकूणच हा बदल फार मोठा आहे. इंग्रजांनी त्यावेळी तो केला, पण 'रोख पगार' या आकर्षक प्रलोभनाने. आता तसे प्रलोभन असणार नाही. इतकेच नव्हे तर हे जाणीवपूर्वक, स्वखर्चाने करायचे आहे. सकृतदर्शनी कठिणच आहे. पण आपण नजिकच्या इतिहासातून पुष्कळ काही शिकतो आहोत. इतिहास व भावी काळ यांचे पारदर्शक चित्र पाहण्याची आपली क्षमता आहे. काहींच्या समोर हे चित्र ठेवून ती क्षमता निर्मावी लागेल. भावी पिढीच्या कल्याणासाठी हे प्रयत्नपूर्वक करायला हवे ! अस्पृश्यता, धुम्रपान, मद्यपान यातील पदरी पडलेली सुधारणा उत्साह वाढवील. नोकरी म्हणजे गुलामगिरी, कुत्र्याचे जिणे अशी भारतीयांची जुनी धारणा आता जागृत होऊ दे ! उगवते संपूर्ण मौलिक विद्यार्थी जीवन झिजवून औपचारिक, वाझ, अनैसर्गिक व सक्तीच्या विद्यमान इंग्रजी शिक्षण पद्धतीने

आपण फक्त बेकार या पदवीलाच पात्र झालो आहोत, हे जळजळीत वास्तव जेव्हा नवसहस्त्रकाच्या उंबरठ्यावरील बहुसंख्य प्रमाणपत्रधारी तरुणांच्या लक्षात येईल तेव्हा ते आजवरच्या आम्हा कर्त्यांना अपराधाच्या पिंजऱ्यात उभे करून जाब विचारतील याची जाणीव देवूया ना?

सर्व विचारवंतांनी एकत्र येणे, निर्विवाद पारदर्शक कसोटी सिद्ध करता येणे, पालकांनी निवड स्वीकारणे अशा एकापेक्षा एक अवघड वाटणाऱ्या या पायऱ्या आहेत. ओलांडणे अपरिहार्य वाटणे, त्यासाठी एकात्मिक प्रयत्न होणे ते यशस्वी होणे व स्वीकारणे हा त्याचा दुसरा टप्पा. दोन्ही टप्पे ओलांडल्यावर सुरुवात होईल व पहिले विद्यार्थी पालक झाल्यावर त्याला स्थैर्य येईल. प्रिं. नाडकर्णी म्हटलेली ५० वर्षे तेव्हा जवळपास असतील/झालेली असतील. मात्र आताच सुरुवात केली तर !

मा. राष्ट्रपतींचा तेव्हाचा अनुभव प्रेरक मानून आपल्यातल्या सर्व विधायकतेला, सौजन्याला, दूरदृष्टीला, शोधकतेला, संस्कृतनिष्ठेला, राष्ट्रभक्तीला, गुणात्मकतेला व अशाच सर्व गुणवत्तेला आवाहन करूया. म्हणजे भारत खऱ्या अर्थाने सुजल, सुफल, मलयज शीतल, सस्य शामल होईल. हा संकल्प करूया व सिद्धीसाठी आत्मीयतेने प्रयत्न करूया.

प्रिं. नाडकर्णी म्हणाले ते चित्र हेच असेल का?

भविष्यात ग्रामीण जीवनात यात बदल झालाच पाहिजे.

**पुं.गो.मणेरीकर**
एम्.ए.बी.एड्.
निवृत्त मुख्याध्यापक
सुभेदार वाडा (कल्याण),
मो.ह.विद्यालय (ठाणे)

## सहवेदना

अनेक भाषांतील उत्तमोत्तम कविता मराठीत आणणारे तत्त्वचिंतनाकडे कल असणारे ठाण्याचे श्री. निरंजन उजगरे यांचे १२ डिसेंबर २००४ रोजी निधन झाले.

उजगरेंना अनेक मान सन्मान मिळाले, अनेक महत्त्वपूर्ण समित्यांवर त्यांनी काम केले. त्यांचा 'दिपवा' हा काव्य संग्रह विशेष भावलेला काव्य संग्रह. उजगरे अतिशय रसिक मनाचे, संवेदनशील कवी होते. ठाण्यातील त्यांच्या सुमारे तीन दशके असणाऱ्या वास्तव्यात अनेकदा त्यांची भेट होई. आता हे संपले.

त्यांच्या भाषांतरीत कवितांची चरणसूची बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथशास्त्राच्या एका विद्यार्थ्याने २-३ वर्षांपूर्वी केली होती. तेव्हा त्यांनी केलेले सहकार्य अजोड होते.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो!

- संपादक

दिशा
नियमित वाचा
आपली मते जाणून घेण्यास
आम्ही उत्सुक आहोत.

# साद...

*श्री. मधुकर देवधर यांच्या कवितेचा हा रसास्वाद. - संपादक*

माझ्या मुलाखतीच्या सदरासाठी मी नेहमी कलंदर माणसांच्या शोधात असायचो. त्याच दरम्यान माझ्या काकू सौ. वंदना प्रसादे यांच्याकडून मला श्री. मधुकर देवधर यांच्या बद्दल आणि त्यांच्या कवितेबद्दल माहिती मिळाली आणि माझ्यातला मुलाखतकार जागा झाला. मुलाखतीसाठी मी त्यांचे काहूर, धुंद मनी, जपताना गोड स्मृती आणि संथ सलील मंद लहर हे चार पूर्वप्रसिद्ध काव्यसंग्रह वाचले आणि त्यातूनच मला त्यांना भेटण्याची ओढ निर्माण झाली. भेटीच्या सुरुवातीलाच माझी मुलाखत छापू नका फक्त माझ्या कवितेबद्दल काही चांगले-वाईट लिहता आले तर प्रयत्न करा असे मला त्यांनी सांगतले आणि त्यांच्या काव्यमय प्रवासावर भाष्य करणारी एक आगळी-वेगळी मुलाखत वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झाली.

देवधर आणि माझ्या वयात साधारण सहा दशकांचे अंतर. पण या आमच्यातला सहा दशकांना जोडणारा दुवा म्हणजेच देवधरांच्या कविता होय. वयाच्या ऐंशीच्या वर्षीसुद्धा देवधरांची काव्यनिर्मिती पाहिली तर त्यांच्यावर सरस्वतीचा वरदहस्तच आहे असे म्हणायला कहीच हरकत नाही. मुलाखतीच्या व इतर भेटी - गाठींच्या दरम्यान मला त्यांचे अनेक पैलू उमजले. सुरुवातीच्या त्यांच्या काव्यसंग्रहातून त्यांची कविता निसर्गात्मक दिसते. याचे उत्तर शोधताना मला कळले की भटकंतीची भरपूर आवड असणारा हा कवी आहे. दऱ्या-खोऱ्यातून ते हिंडलेले आहेत आणि म्हणूनच त्यांच्या कवितेतून निसर्गाची हिरवळ आपल्याला दिसून येते.

आज त्यांचा पाचवा 'कृतार्थ' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध होत आहे. या काव्यसंग्रहात देखील आपल्याला निसर्गाच्या काही छटा अनुभवायला मिळतात. 'या आंब्याच्या झाडाखाली' या कवितेतून कवीने फक्त झाडाचेच नव्हे तर त्याच्या आजूबाजूच्या घटकांचे जीवांचे देखील अचूक चित्रण पुढील ओळींतून केलले आहे.

खोडाच्या सालीला
खूप वळ्या पडल्या आहेत
त्यांच्या आत खोलवर
काळोखाची वाट पहात
काजव्यांच्या माळा दडल्या आहेत

'बहर' या आणखी एका कवितेतून निसर्गाचा वेगळा भाव मांडण्याचा प्रयत्न केला आहे. या कवितेतून ते जगण्याचा आशवाद देतात. कवितेतील शंख शिंपल्यांच्या रांगोळ्या अशा कल्पना मनाला सुखावून जातात.

वर्षाऋतूच आगमन होताच
वठणाऱ्या झाडाला पालवी फुटेल
वेलीची पाने टवटवतील
तुझी मान परत सरळ होईल

'आकृत्या' या कवितेतून जेव्हा कवी जुनाट वाड्याच्या इतिहासाचे वर्णन करतो तेव्हा त्यांच्या चित्रणाला विशेष दाद द्यावीशी वाटते. कविता वाचताना त्यातील प्रत्येक गोष्ट ही डोळ्यासमोर उभी रहाते.

भिंतीला गेलेले
उभे आडवे तडे
कुठे गिलावा पडलाय
तर कुठे रंगाचे पोपडे

रंगांशी असलेलं देवधरांचं नातं हे अतूट आहे; कारण ते फक्त कवीचं नाही तर चित्रकार देखील आहेत. पाच वर्षे त्यांनी चित्रकलेचा अभ्यास केलेला आहे आणि कदाचित त्यामुळेच निसर्गाच्या बारीक-सारीक छटा त्यांच्या कवितेत साकार होतात. 'रजनी' या कवितेतून त्यांची ही कारागीरी सिद्ध होते. रात्रीचे विविधांगी केलेले चित्रण हे या कवितेचे वैशिष्ट्य आहे. देवधरांच्या कवितेत जाणवणारी आणखी एक गोष्ट म्हणजे इंग्रजीतील येणारे संदर्भ. कारण त्यांचा इंग्रजीचा व्यासंग दांडगा आहे. बी.ए.ला इंग्रजी हा विषय घेऊन त्यांनी पदवी घेतलेली आहे. त्यामुळे कवीचा कवितेकडे पाहण्याचा अभ्यासू दृष्टीकोन आपल्याला नक्कीच दिसतो.

या काव्यसंग्रहात आश्रम शाळा, वरदान, चोळामोळा यासारख्या अनेक दर्जेदार गद्य कविता देखील दिसून येतात. पण कवी फक्त गद्य कवितांनाच बांधलेला नाही. तर त्यांच्या कवितेत एक प्रकारची लयबद्धता आहे. मनाला सुखावून टाकणारा ताल त्यात आहे. कारण मुळात संगीताची अत्यंत आवड असलेला हा कवी आहे. 'स्मृती विस्मृती' या कवितेतून ते वयाच्या मर्यादांवर अचूक भाष्य करतात. वयोमानाने शरिरात व पर्यायाने स्मृतींमध्ये होत जाणारे बदल पटवून देण्यासाठी जणू ते स्वत:चेच उदाहरण कवितेत देत आहेत असे वाटते.

*या साऱ्या गोंधळात*
*मी उजेडात चाचपडत असतो*
*काही शब्द जुळवीत असतो*
*पण दुसरं कडवं रचता रचता*
*पहिले कडवं विसरत असतो*

वयाचाच विषय निघाला आहे तर 'लहान व्हावं' ही कविता देखील विशेष वाटते. 'रम्य ते बालपण' या संज्ञेवर आधारित ही कविता आहे. हे बालपण आता पुन्हा यावं अशी इच्छा ते पुढील ओळींतून व्यक्त करतात.

*कशाला मोठा झालो*
*झालो नसतो तर*
*फार बरं झालं असतं*
*पुन: लहान व्हावं*
*अगदी लहान व्हावं*
*शैशवात शिरावं*
*आणि पाटीदप्तर घेऊन*
*पळत पळत वर्गात शिरावं*

काव्यसंग्रहातील 'शिबीर' ही कविता नक्कीच आपले लक्ष वेधून घेते. प्रत्येक माणसात काही तरी गुण-दोष हे असतातच. पण आपण दोष विसरून त्यातले गुण स्वीकारायला हवेत असा आशय अगदी सोप्या शब्दांत कवीने येथे व्यक्त केलेला आहे. ही कविता जणू संत कबीराचे लहानसे चरित्रच होय. 'ॐ नमो बुद्धाय' ही कविता चिंतनशीलतेकडे वळणारी आहे. आपल्या सोयीनुसार, आवडी-निवडीनुसार माणसे मूळ तत्त्वांना कशी मुरड घालतात यावर ही कविता अचूक बोट ठेवते.

अखेर बुद्धतरी काय
मानवच होता
त्यालासुद्ध या पायऱ्या ओलांडण
काही सोप गेल नसेल
केवळ परीक्षा पाहण्यासाठीच
त्याने या नीतीतत्वाचा
उपदेश केला असावा

'काव्यात्मक उत्तर' ही कविता नक्कीच मुखावर हासू आणते. पण त्याचबरोबर आपल्याला विचार देखील करायला लावते. सर्वसामान्य माणसांना कविता कशा सुचतात असा नेहमी प्रश्न पडतो. पण कविता सुचण्याची अशी ठराविक वेळ नसते. खरं सांगायचे झाले तर कवितेची प्रक्रिया कवीच्या मनात अखंड सुरू असते. स्वत:ला आलेल्या अनुभवांतून किंवा या दुनियेत वावरताना दृष्टीस

पडलेल्या घटनांमुळे कविता सुचू शकते. परंतु कविता म्हणजे स्वत:ला आलेले अनुभवच असतात असे मुळीच नाही. कवितांचे जग काल्पनिक देखील असू शकते. थोडक्यात सांगायचे झाले तर उत्कट भावनांचा सौंदर्यपूर्ण अविष्कार म्हणजे कविता.

प्रत्येक कलाकाराच्या कलासृष्टीत त्याचे स्वत:चे असे एक अनुभवविश्व असते. प्रत्येक कलावंताचे व्यक्तिमत्व, त्याचे भावविश्व भिन्न असते. कलावंताचा प्रतिभाधर्म व त्याची अनुभव घेण्याची पद्धती यानुसार कलावंताच्या कलासृष्टीतील अनुभवविश्वाचे स्वरूप, त्याची प्रकृती ठरत असते, घडत असते. कलासृष्टीत कलावंताच्या अनुभवविश्वाची प्रकृती सामान्यत: दोन प्रकारची मानली जाते. काही कलावंतांचे अनुभवविश्व हे बहुकेंद्री तर काहींचे एककेंद्री असते. काव्यसृष्टीतही काही कवींची कविता एकाच अनुभव विश्वाभोवती फिरत राहते. त्यांच्या प्रत्येक कवितेत कवी त्याच विषयाची विविध अंगे कवितावद्ध करत असतो. त्यांची प्रतिभा एकाच आशयाभोवती रूंजी घालत असते आणि त्यात त्याच विषयाची विविध रूपे मूर्त केलेली असतात. अशी कलाकृती ही एककेंद्री म्हणवली जाते. बालकवी व इंदिरा संत यांच्या काव्यसृष्टीतील अनुभवविश्वाची प्रकृती ही एककेंद्री आहे. याउलट जीवनाच्या विविध अंगावर कविता करणारेही काही कवी आहेत. त्यांची कविता एकाच प्रकारच्या विषयाला बांधलेली नसते. त्यांचे अनुभवविश्व भिन्न भिन्न प्रकृतीच्या आशयांनी व्यापलेले दिसते. अशाप्रकारचे अनुभवविश्व हे बहुकेंद्री असते. केशवसुत मर्ढेकर, पाडगावकरांसारख्या कवींच्या कविता अनेककेंद्री आहेत. कवी मधुकर देवधर देखील याच पठडीतले आहेत. त्यांच्या काव्यसंग्रहातून जीवनाचे विविध पैलू विविध अंगाने ते चित्रित करतात.

त्यांच्या सर्व काव्यसंग्रहांप्रमाणे 'कृतार्थ'चे देखील त्यांनी कोणतेही व्यावहारिक मूल्य ठेवलेले नाही. कारण कविता या अनमोल असतात असं मानणारा हा कवी आहे. रसिकांची आतून आलेली दाद हीच खरी या काव्यसंग्रहाची किमत आहे. नक्कीच या कविता रसिकंना अंतर्मुख करतील अशी आशा वाटते.

गीतेश गजानन शिंदे
२०३, स्वप्नजा सोसायटी,
धोबी आळी, मावळी मंडळ हॉल जवळ,
ठाणे (प.) - ४०० ६०१.
दूरध्वनी - २५३७९५१९

### कोकण साहित्य परिषद

परिषदेचे साहित्य संमेलन यंदा ठाण्यात होत आहे. या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ संपादक व पत्रकार माधवराव गडकरी हे असणार आहेत.

ठाण्याच्या साहित्य वर्तुळात ७,८,९ जानेवारी २००५ रोजी होणाऱ्या या संमेलनासाठी सद्या साहित्याविषयी चर्चा चालू आहेत. ठाणे येथे यापूर्वी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले होते.

दिशा
नियमित वाचा

# विमनस्कपणाचा अंतर्मुख करणारा आविष्कार - जीर्ण देव्हारा

*चांगली कविता वाचावयास मिळणं, हा दुर्मिळ योग असतो. रामदास खरेंच्या 'जीर्ण देव्हारा' या काव्य संग्रहामुळं हा योग आला. या काव्य संग्रहावर बरंच लिहिता येईल. पण निदान एक ओळख व्हावी म्हणून हा परिचय. - संपादक*

आजच्या मानवी समाजामधील क्षणोक्षणी आणि पदोपदी अर्थशून्य ठरत चाललेले भयाण वास्तव, जीवनात ग्रासून टाकणारी संवेदनहीनता आणि जीवनातील विरोधाभास या सर्वांचा संवेदनशील कवीच्या मनावर दाट परिणाम झाल्यास कवीची जी घुसमट होईल तिला मिळालेला उद्‌गार म्हणजे ठाण्यातील जुने कवी मित्र रामदास खरे यांचा नवा काव्यसंग्रह 'जीर्ण देव्हारा' हा होय! स्पदंन या पहिल्या काव्यसंग्रहाच्या तुलनेत व पार्श्वभूमीवर 'जीर्ण देव्हारा' मधील कविता ही अधिक परिपक्व असा अविष्कार आहे. या काव्यसंग्रहाचे खास वैशिष्ट्य म्हणजे क्षणो क्षणी ढासळणाऱ्या वास्तवाचे अतिशय अस्वस्थ करणारे टोकदार भान हे होय !




५१ कविता असणाऱ्या या संग्रहातील बहुतेक कविता असा घुसमटीचा अविष्कार आहे.

वाढते शहरीकरण त्यातून अपरिहार्यपणे येणारा बकालपणा, निसर्गाचे झपाट्याने होत असणारे रुपांतर निष्ठा, जीवनमूल्ये यांचे वेगाने निर्माल्यामध्ये होणारे परिवर्तन या कवितेचा विषय आहे. विषय काहीसा तोच तो, बंडाचा झेंडा रोवू पहाणारा व परंपरागत वाटत असला तरी खरे यांचा अविष्कार, स्वतःची प्रतिभा व शैली यामुळे प्रभावीच ठरतो

महात्माजींवर मराठीत खूपच कविता झाल्या. अगदी मर्ढेकरांच्या कवितेपासून 'बापूजी' हा कवितेचा व कवितेच्या माध्यमातून समाजावर भाष्य करणारा विषय आहे. रामदास खरेंच्या या संग्रहातील (पृ. ८) 'महात्माजी' ही कविताही प्रभावीपणे आजचे वास्तव अधोरेखित करते.

तुम्ही जन्म दिलेली
अहिंसेची शुभ्र पाखरं
माना खाली घालून
वाट पहात आहेत
गिधाडांची
तुमच्याच समाधी पाशी

पाखरांचा उल्लेख व त्यातून सूचित होणारी महात्माजींची जीवन तत्त्वे, या तत्वांना पायदळी तुडविणारी माजलेली गुंड प्रवृत्ती, या गुंडांच्याच हातात गेलेली सत्ता आणि या सर्वासमोर अगतिक झालेली जनता या 'अॅसिडिक' अविष्कारातून समोर येते. त्यांच्या जीवनातील प्रश्नोपनिषदांची पाने उलगडत रहातात.

या चंगळवादी जीवनशैलीचा अपरिहार्य परिपाक म्हणजे अनुभवास येणारी हताशा पृ. ११ वरील 'पराभूत' या कवितेतील पुढील ओळी ही आगतिकता व्यक्त करतात.

माझ्या अलिशान फ्लॅटमध्ये
वळवी लागलेले
संस्कृतिकोशांचे खंड शोधतो
हताश होतो

यातील अलिशान फ्लॅट, वाळवी लागले संस्कृतिकोशांचे खंड (संस्कृतीचे प्रतीक) आणि स्वार्थबद्ध जीवन जगता जगता संस्कृती विरत जाणारा तुमच्या माझ्यातील सर्वसामान्य माणूस परिस्थिती शरण होत जातो. आपलचं प्रतिबिंब या कवितांत दिसत रहातं, ही या कवितांची ताकद आहे. अशाच दुसऱ्या कवितेत (पृ. १७-कावळे जाणून आहेत) वाढत्या यातनांचे संदर्भ अस्वस्थ करतात.

कावळे जाणून आहेत
जिवंतपणांच्या यातना
माणसांच्याही

यातील 'ही' अतिशय सूचक आहे. यातना इतक्या वाढत चालल्या आहेत की इथलं अस्तित्वच यातना घरातलं वास्तव्य ठरत आहे.

या बकालपणापासून दूर, निसर्गात दोन क्षणांसाठी जायचं तर तेथेही 'माणसां[illegible] किनाऱ्यांचा शोध लागतो. (पृ. ५६-५७ 'शोध') आणि उद्विग्नता अधिक गडद होते. निसर्गाचा हळुवार स्पर्श क्वचित होऊ पहातानाच 'म्युझियम' (पृ. ५८) पृ. २४ वरील 'तिला खूप काही' ही मादीपणाची भावना व्यक्त करणारी कविता, 'उध्वस्त घरटी' (पृ. २९) या कवितेतील मानवी नातेसंबंधावर भाष्य न करताही खूप काही सांगून जाणारी कविता अशा अनेक कविता या कवितासंग्रहाचे वैशिष्ट्य आहे. वास्तविक कविता या साहित्य प्रकारात विशेष ताकद असूनही काही विशिष्ट स्थितीमुळे या साहित्य प्रकारची उपेक्षाच केली जाते. 'जीर्ण देव्हारा' सारख्या कविता संग्रहाची अशी उपेक्षा करणे योग्य ठरणार नाही. पण 'साहित्य संस्था' चालविणाऱ्या कार्यकर्त्यांना हे समजणार कसं? असो.

सर्व कविता वाचल्यावर टीपकागदावर शाईचा थेंब पसरत जावा तसा कवींच्या घालमेलीचा अर्थ मनावर पसरत जातो. कवी म्हणून जाणवणारी शून्यमनस्कता, जीर्णत्व श्री. रामदास खरे अगदी सहजपणे, प्रामाणिकपणे कोणताही मुखवटा न घालता व्यक्त करतात हे महत्वाचे. रूढ अर्थाने 'झिंदाबाद मुर्दाबाद' चा सामाजिक आशय सांगून पहाणारी कविता नाही. पण बेसावध क्षणी समाजाला नग्न अवस्थेत पकडून त्याच्यासमोर आरसा धरण्याचे एक सामाजिक धाष्ट या कवितेत आहे.

**- मोहन पाठक**

**जीर्णदेव्हारा**

लेखक : रामदास खरे

ठाणे , स्वरंग निर्मिती, २००४

पृ. ७०, मूल्य रु. ७०

# कल्याण शहराच्या प्राचिनत्वाचे शिलालेख...

*अलीकडेच कल्याण शहरावील सीडीचे प्रकाशन समारंभ पूर्वक झाले. त्या पार्श्वभूमीवर कल्याण इतिहासाचे अभ्यासक श्री. र. पुरोहित यांचा हा लेख.- संपादक*

कोणत्याही गावाचा किंवा शहराचा इतिहास लिहिताना ते गाव किंवा शहर किती जुने आहे याचा शोध घेण्याची जी साधने ती म्हणजे जुनी ऐतिहासिक कागद पत्रे, शिलालेख, ताम्रपट इ. या साधना शिवाय आपणास हा इतिहास माहीत होत नाही. सुदैवाने कल्याणच्या बाबतीत असे उल्लेख शिलालेखात आढळून येतात. महाराष्ट्रात अशी पुष्कळ गावे किंवा शहरे आहेर की ज्यांचा इतिहास फारच जुना आहे. अशा पैकीच कल्याण हे शहर आहे.

ठाणे जिल्ह्यात असलेल्या कल्याण तालुक्याचे, कल्याण हे मुख्य ठाणे आहे. हे ठिकाण उत्तर अक्षांश १९१४ 'व पूर्व अक्षांश ७३ १०' व आहे. ते ईशान्य व वायव्य दिशेला जाणाऱ्या मध्य रेल्वेच्या लोहमार्गा वरील मुख्य ठिकाण आहे. हे शहर मुंबईपासून ईशान्य दिशेला तेहतीस मैलावर वसलेले आहे. कल्याणच्या आजूबाजूस खाडी व नदी आहे. ही नदी म्हणजे उल्हास नदी आणि हिच्या काठच्या प्रदेशात कल्याणचे स्थान मोडते. हा प्रदेश पश्चिम किनाऱ्यावरचा एक मुख्य भाग आहे. कारण या भागातूनच महाराष्ट्राच्या अंतर्गत भागात-थळघाट, बोरघाट व नाणेघाट यातून थेट मराठवाड्यात तेर-तगर पूर्वी व्यापारासाठी अत्यंत प्रसिद्ध होते. येथे तयार होणारा व्यापारी माल याच घाटातून कल्याण बंदरात येत असे व तेथून तो जलमार्गाने परदेशी जात असे. लोहमार्गावरील हे मुख्य ठाणे असल्याने भारताच्या ईशान्य म्हणजे दिल्ली, पंजाब वगैरे भागात व अग्नेय म्हणजे पुणे व त्याच्याही खाली मद्रास, कोचीन वगैरे भागात जाता येते. अशा या मोक्याच्या ठिकाणी कल्याण वसलेले असल्याने भौगोलिक, आर्थिक व व्यापारी दृष्ट्या कल्याणचे स्थान विशेष महत्त्वाचे आहे.

कल्याणच्या प्राचीन अस्तित्वाच्या संशोधनाचे प्रमुख ठिकाण म्हणजे मुंबई जवळ असलेली कान्हेरी येथील बौद्ध लेणी व प्रमुख साधन म्हणजे या लेण्यातील शिलालेखात कल्याणचा उल्लेख आढळतो. या लेणी अनुक्रमे २, ३, १२, ३६, ३७, ५६, ५९ व ८९ या होत. त्याचप्रमाणे लेणी क्रमांक १४ व १५ या मधील सुट्या दगडावर पण कल्याण येथील दानशूरांची नावे आहेत. हे सर्व दानशूर बौद्ध धर्मीय होते. हे शिलालेख व शिष्ठी पुत्र पुलोयामी आंध्र (इ.स. १३३-१६२) व काही गौतमीपुत्र दुसरा (इ.स. १७७-१९६) यांच्या काळातील आहेत. वर उधृत केलेल्या लेण्या मधील कल्याणचे उल्लेख गुहा व पाण्याचे हौद दान दिल्या बाबतचे आहेत व दान देणारे सर्वजण कल्याणचेच होते असे या शिलालेखा वरून कळते. या वरून कल्याणची ओळख इ.स. १३३ पासून आहे आणि यावरून आपल्याला कल्याणचे प्राचिनत्व समजून येते. हे सर्वच्या सर्व शिलालेख वाचून दाखविणे वेळेच्या मर्यादांमुळे शक्य नाही. फक्त वानगीदाखल छत्तीस क्रमांकाच्या लेण्यातील शिलालेखांचा उल्लेख करीत आहे. याची भाषा मुळात प्राकृत आहे. नंतर त्याचे संस्कृत व इंग्रजी भाषांतर माहिती साठी देत आहे. शिलालेख येणे प्रमाणे आहे -

सिधं रञो माढतिपुतस स्वामि (सिरी) सेनस
सवछरे ८गिप ५ दिवस १० एतायं पवाच क-
लियाणकस नेकमस वेण्हुनदिस पुतस नेग-
मस गहपतिस (सात?) स लेणं पतिठापि-
त सहा आय्यकेन नसहा पितुना वेण्हुनं-
दिना सदामातुये बोधिसमाये सहा भा-
(तुना...) हाथिनासह सवेन (निकायेनेति)

" Siddhom' In the 8th year of king Madhariputla the Lord Sirisena, in the 6th fomight of Grishma, the 10 th day. On the above (day) a merchant householders the son of Venhunandi merchant, a resident of Kalayana, constructed a cave of Satta? with the respectable.... with his bother Venhunandi, with his brother Bidisama with his brother.... hathi with an assembly of all (inkaya) co-religion

या व्यतिरिक्त प्रसिद्ध झालेले आणखी शिलालेख आहेत व ते सर्व कल्याण संबंधी आहेत हे शिलालेख शंभर वर्षापूर्वी, प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांचे इंग्रजी भाषांतर माहिती साठी देत आहे-

1) or the religious assignation of cistern fitled to east a thousand seasons, Samidabha a goldsmith of Kalayana (Callian) कल्याणच्या सामिदभ बौद्धधर्मीय सोनाराने पाण्याची टाकी दिल्याबद्दल.

2) To the perbectone. The religious assignation of a cave and cistern Rishi-bala, skilled in sacred learning, son of Ganlinaka of the city of Kalyan; skilled in sacred leaming along with his attendants to at one for their parent's sins. An inexhanstible treasure is here deposited and the tooth of the venerable personage skilled in sacred science displays its in benence with holly bield under the pole resembling monument. What then. O! Ye monks, who keep the appointed sessions is there distinguished with workmanghil even of Kuber, or with most sprended apparel? Happy is the man or subdued passions whether a religions students or one who has a perfect knowledge of the times."

कल्याणचा गौलिनकाचा मुलगा ऋविहाल, जो सर्व पवित्र शास्त्रात पारंगत होता त्याने आपल्या मातापित्याचे पापक्षालन होण्यासाठी एक गुहा व पाण्याची टाकी दिली. याच ठिकाणी कधी न संपणारे धन पुरलेले आहे. त्याचप्रमाणे सर्व शास्त्रात पारंगत असलेल्या सर्वश्रेष्ठ व्यक्तीचा दात (बुद्ध?) पण पुरलेला आहे. (बहुधा स्तूपाखाली). या सर्वांची जी कारागिरी आहे ती कुबेराच्या कारागिरीच्या तोडीची आहे.

3) To the perfect-one! The religions assignation of a cave, a water cistern, a seat, a cupboard and a rowob couches for the sick. These have been (bestowed) for the saneti (bication) of religions (devotees) and wisemen, along with their attendants, by Dharm (anaka) skilled in sacred learning, son of sayana, Sarvamata of Vas (ai) (Bassein) near Kaly (an). Come hitherallye monks from the four quartere (of haven) to the house established from regard to the (donors), bather and mother. Come hither from every quarter, but here too, is deposited an imperishable treasure.

कल्याण जवळच्या वसई येथील साधना सर्वमत याचा मुलगा धर्मनक. जो सर्व शास्त्रात पारंगत आहे. त्याने एक गुहा, पाण्याची टाकी, एक बैठक, एक कपाट आणि आजारी माणसांना बसण्यासाठी बाके या ठिकाणी दान दिली आहेत. हे सर्व चारी दिशांतील भिक्षूंनो तुम्ही याठिकाणी या कारण या ठिकाणी कधीही नाश न पावणारी संपत्ती पुरलेली आहे.

4) To the perfect one ! To Damila, the mendicantasectic of Kalyan to religious assignation of a cave.

कल्याण येथे भिक्षेवर उपजिविका करणारा साधू-संन्यासी ह्याने गुहादान दिली. त्याचे नाव दाम्रिलाय.

५) To the perfect one ! To Damla, inhabitant of Kalyan famed throughout the world and purified, the religious assignation of a cave and cistern in the Kanha hill. Peace.

कान्हेरी लेण्यात, कल्याणचा रहिवासी दामिला, जो पवित्र आणि सर्वत्र प्रसिद्ध आहे, त्याने एक गुहा व पाण्याची टाकी दान दिली.

या प्रसिद्ध झालेल्या शिलालेखाव्यतिरिक्त ज्या

दुसऱ्या शिलालेखामध्ये कल्याणसंबंधी माहिती आहे ते शिलालेख व ज्या गुंफा - लेण्यात ते आहेत त्यांची माहिती येणेप्रमाणे -

लेणी नं. २ - हा शिलालेख दोन ओळींचा आहे. याची अक्षरे वशिष्ठी पुत्राच्या (इ.स. १३३-१६२) कालातील आहेत आणि त्यात पाणी (पानीक) दान केल्याचा उल्लेख आहे. दान देणाऱ्याचे नाव स्वामिदत्त असे आहे व तो कल्याणचा राहणारा होता. पाण्याचे दान याचा अर्थ पाणी साठविण्यासाठी दगडी टाकी किंवा कुंड असा घ्यावयाचा.

लेणी नं. ३ - दान देणाऱ्याचे नाव व काय दान दिले याचा उल्लेख - खुलासा ग्यॅझिटियर ऑफ् बॉम्बे प्रेसिडेन्सि खंड १४. भाग ३ ठाणे यामध्ये नाही. परंतु या लेण्यात कल्याणच्या उल्लेखाचा शिलालेख आहे हे मात्र गॅझिटियर मध्ये दिले आहे.

लेणी नं. १२ - ही लेणी नं. ११ च्या विरुद्ध दिशेला आहे. शिलालेख दहा ओळींचा आहे. अक्षरे वशिष्ठी पुत्राच्या कालातील आहेत. दान दिलेल्या वस्तू लेणी, पाण्याचा हौद, दगडी व्यासपीठ आणि झोपण्यासाठी दगडी बाक दान देणाऱ्याचे पुसून गेले आहे. परंतु तो कल्याणचा राहणारा होता व त्याच्या वडिलांचे शिवमित्र होते असे समजते.

लेणी क्र. ३६ - यात एकंदर तीन शिलालेख आहेत त्यापैकी दोन एकाच विषयावर व एकाच तारखेचे आहेत. सुरुवातीला ह्यांचा उल्लेख आलेला आहे. तिसरा शिलालेख दहा ओळींचा आहे व तो गौतमीपुत्र दुसरा (इ.स. १७७-१९६) याच्या कालातील आहे. यामध्ये कल्याण येथे राहणारा नंदन याचा पुत्र अचल (अचल) याची पत्नी लवतिका हिने लेणी, पाण्याचा हौद, स्नानासाठी हौद दान केल्याचा उल्लेख आहे.

लेणी नं. ५६ - लेणी क्र. ४५ च्यावर ही लेणी आहेत. या शिलालेखात कल्याण येथे राहणाऱ्या एका बौद्धधर्मीय उपासकाने (नाव नाही) लेणी व वृत्ती सरंजाम दान केल्याचा निर्देश आहे.

लेणी क्र. ८९ - ग्यॅझिटियरमध्ये या लेण्यातील शिलालेखाची माहिती नाही पण या लेण्यात कल्याणच्या उल्लेखाचा शिलालेख आहे मात्र नमूद केले आहे. लेणी क्र. १४ व १५ मधील खडकावर एक चार ओळींचा शिलालेख आहे. अक्षरे वशिष्टीपुत्राच्या कालातील आहेत. त्यात कुमारनंद नावाच्या कल्याणच्या रहिवाशाने पायवाट किंवा रस्ता करून दिल्याचा उल्लेख आहे.

कान्हेरी येथील लेण्यानंतर कल्याण विषयी लेण्यामधील उल्लेख जुन्नर येथील लेण्यात आढळतो. या शिलालेखात कल्याणमधील रहिवाशांनी पाण्याची टाकी व चैत्यगृह दान दिल्याबद्दल नामनिर्देश आहे. त्यांची नावे स'क व सुलसदत्त अशी आहेत.

शिलालेख क्र. २८

The meritorious gift of a cistern by sanghaka a goldsmith, son of Kudira of Kalyana.

कल्याण येथे राहणारा सोनार कुडीर याचा पुत्र स'क याचे पाण्याची टाकी दान दिल्याबद्दल

शिलालेख क्र. ३०

The meritorious gift of a construeted Chaityagraha by the distiguished sucasdata, son of Heranika of Kalyana.

कल्याण येथील हेरानिक याचा पुत्र सुलसदत्त स्तुतीस पात्र असे चैत्यगृह दान दिल्यासंबंधी आतापर्यंत उधृत केलेल्या शिलालेखावरून असे आढळते की कल्याणचे पुरातनत्व इ.स. १३३ पासून आहे आणि त्यावरून या शहराचे प्राचिनत्व समजून येते. याप्रमाणे हे प्राचिनत्व आपणास विशद केल्यावर आपणास आपल्या शहराचा

रास्त अभिमान वाटणे साहजिकच आहे. त्यासाठी हे शिलालेख ज्यांनी वाचले व त्यांचे प्राकृत व संस्कृत व इंग्लीश भाषांतर केले त्या पाशिमात्य गाढे संशोधक प्रा.एच्. लुडर्स यांचा या ठिकाणी निर्देश करणे अगत्याचे आहे.

याठिकाणी कल्याणसंबंधी जुना म्हणजे १५ व्या शतकातील एका महत्त्वाच्या उल्लेखासंबंधी निर्देश करण्याचा मोह टाळता येत नाही म्हणून त्याबाबत माहिती देत आहे.

गुर्जर शिवण्यास नावाच्या एका महानुभाव लेखकाने चक्रधरोक्तसुक्तशावर भाष्य करताना "महंत राष्ट्र म्हणोनि महाराष्ट्र' अशी पादेशाची - महाराष्ट्राची व्याख्या केली आहे. इतकेच नव्हे तर ऐहेलिच्या शिलालेखात उल्लेख केलेल्या ती महाराष्ट्र का प्रमाणे हा शिवण्यासही श्रीन्नर जुन्नर कल्याण खांदार तीन भाग मन्हाट' असे महाराष्ट्राचे तीन भाग सांगतो. यावरून महाराष्ट्राचे जे तीन भाग या महानुभाव लेखकाने वर्णन केले आहेत त्यापैकी एक भाग कल्याण होता असे दिसून येते. या भागावरून महाराष्ट्राच्या क्षेत्र विस्ताराची कल्पना येते. या भागातील कल्याणसंबंधी शंका काहींच्या मनात असली तर त्याचे निरसन करणे जरूरीचे आहे. पण एक लक्षात घ्या की हे भाग म्हणजे त्या वेळच्या महाराष्ट्राच्या सीमा होत.

महाराष्ट्राच्या नकाशावर या चारही गावाचे स्थान पाहणे जरुरीचे आहे. त्यावरून असे दिसते की श्रीन्नर (सिन्नर), त्याच्याखाली जुन्नर या दोहोंच्या डाव्या हाताला कल्याण आणि कल्याणच्या सरळ रेषेत उजव्या हाताला खांदार (कंधार - मराठवाडा) नकाशावर हे दृश्य असे दिसेल




येथे एक महत्त्वाचा मुद्दा लक्षात घ्यावयास हवा तो असा की जुन्नर हे नाणेघाटा जवळचे मोठे शहर. महाराष्ट्रातील त्यावेळच्या पैठण, तगर (तेर मराठवाडा) या व्यापारी पेठातील व्यापारी माल म्हणजे तांबे, शिसवी लाकडाचे मोठ मोठे ओंडके, कापड, रेशीम वगैरे माल निर्यात होत असे. हा माल पैठण. तेर येथून जुन्नरला येत असे व तो जलमार्गाने परदेशी पाठवावयाचा म्हणजे जुन्नरला जवळचे बंदर कल्याणच होय व तेथून तो पश्चिम किनाऱ्यावरील बंदराकडे व तेथून सिलोनला वळसा घालून परदेशी पाठवावयाचा. या चार स्थानामध्ये जुन्नरचे स्थान मध्यवर्ती जुन्नरपासून जितक्या अंतरावर डाव्या बाजूस (नकाशाप्रमाणे) कल्याण आहे तितक्याच अंतरावर उजव्या बाजूस नकाशाप्रमाणे खांदार-कंधार आहे. पैठण व तेर ह्यांच्या पलीकडे खांदार-कंधार आहे. म्हणजेच व्यास कवीच्या वेळी महाराष्ट्राचे डावे टोक कल्याण व उजवे खांदार-कंधार होते आणि या सर्व प्रदेश मिळून महाराष्ट्राचे क्षेत्र विस्तार होता. कल्याण बंदरातून व्यापारी माल निर्यात होत असे याला पेरिप्लस व कॉसमॉस पुष्टी देतात.

प्रदेश म्हटला की त्याला चतु:सिमा आल्याच. शिवव्यासाच्या वेळी जो महाराष्ट्र होता त्याच्या चतु:सीमांवर दाखविल्या आहेत आणि चतु:सिमामध्ये कल्याणचा निर्देश आला आहे म्हणूनच हा उल्लेख टाळण्याचा मोह टाळता येणे अशक्य वाटल्याने मुद्दाम उधृत केला आहे. त्यामुळे कल्याणकरांचा अभिमान द्विगुणीत झाल्यास आश्चर्य वाटावयास नको.

- श्री. र. पुरोहित

# आनंदाचे डोही

*'तुझे आहे तुझ पाशी परि तू जागा चुकलाशी' या अळोती म्हटल्याप्रमाणे आनंदाचा शोध घेता घेता वागणारी माणसे पाहिली की वाईट वाटतं. आनंद, सुख .. कशाला असणं हे सर्व? संपादक*

अजय आणि सीमा मुंबईच्या एका उपनगरात रहाणारं सुशिक्षित जोडपं. दोघांनी मिळून आपल्या कर्तबगारीवर स्वत:चं घर, गाडी, स्वत:चा संसार उभा केला आणि आता या वेलीवर छानसं फूलही उमललं होतं - राहुल.

आता आतापर्यंत त्यांची गाडी अगदी रूळावरून चालली होती. सुट्टी मिळाली की दोघं आपल्या बाळाला घेऊन कधी सहलीला, कधी हॉटेलमध्ये जेवायला जात असतं. एकमेकांबरोबरचा वेळ जास्तीत जास्त रसपूर्ण बनवण्याचा ते प्रयत्न करत असत. पण गेल्या काही दिवसात काहीतरी बिनसायला लागलं होतं हे खरं ! अधून मधून अजयची चिडचिड व्हायची खूप ताण सहन न झाल्यासारखा आणि राहुल जसा मोठा होत होता तशी त्याचीही काही ना काही भुणभुण असायचीच. हट्टी होत चालला होता, अडूनच बसायचा कधी, पटपट आवरायचा नाही. आज काय तर ''सुट्टीच घेऊ सगळेजण'', उद्या काय तर ''बाबांनी माझी शाळा पाहिलीच नाहीये कधी'', आणि परवा काय तर म्हणे ''रोज रोज पाळणाघरात राहून कंटाळा आलाय!'' एक ना दोन दोघांच्या हजार तक्रारी ऐकून सीमा अगदी वैतागली होती.

आणि तेवढ्यात ती घटना घडली दुपारी अचानक सीमाच्या ऑफिसमध्ये अजयच्या मित्राचा फोन 'वहिनी, अजयच्या छातीत अचानक दुखायला लागलं म्हणून हॉस्पिटलमध्ये चेकप करायला नेलं होतं. आता बरा आहे. त्याला घरी घेऊन येतोय. तुम्ही...' 'हो हो.. मी निघालेच.'

मग सारं कळलं. पस्तीस वर्षाच्या अजयला हृदयविकाराचा झटकाच येऊन गेला बारीकसा. त्यादिवशी ब्लडप्रेशरही खूपच वाढलं होतं. किमान आठ दिवस तरी संपूर्ण विश्रांती घ्यायला सांगितली होती डॉक्टरांनी.

खरंच. सगळ्यांनाच अंतर्मुख करणारी अशी ती घटना होती. इतक्या लहान वयात हृदयविकार, ब्लडप्रेशर? आपलं काही चुकतंय का? आपली जीवनशैली कुठेतरी चुकतेय का? पण आजुबाजुचे सगळे लोक असेच राहतात. मग...?

... सीमा विचार करू लागली... कामाचा प्रचंड ताण, वेळी अवेळी खाणं.. कामाची ठराविक वेळ अशी नाहीच. सगळंच काम काल हवं असणारं, नियमित झोप नाही. व्यायामाला तर फाटाच अशी ही हल्लीची कॉरपोरेट लाईफ स्टाइल आणि यात फिट्ट बसणारा अजय आणि या स्पर्धात्मक युगात टिकून रहायचं असेल तर हे सगळं करावंच लागतं. पण हे जग स्पर्धेकडे या वेगात धाव घेणार असेल तर ज्याला अजय पस्तीसाव्या वर्षी तोंड देतोय तेच राहुलला कोणत्या वर्षी सहन करावं लागेल? अशा सगळ्या विचारांनीच सीमाच्या मनाचा थरकाप झाला.

थोड्याफार फरकाने अशी अनेक उदाहरणं आपण आजूबाजुला बघतो आणि त्यामुळेच माझ्या मनात विचारांची मालिकाच सुरू झाली. बाहेरच्या तणावांना पर्याय नाही पण आपलं घर, आपला मोकळा वेळ इथे तरी आपल्याला खरीखुरी विश्रांती मिळाली पाहिजे, ती मिळते का? ''विल्यम वर्डस्वर्थ'' ची ''लेजर'' नावाची कविताच मला आठवली -

"What is this life it full of care?
No time to stand and stare !"

असा प्रश्नच कवीने आपल्याला टाकला आहे. छे अशा जगण्याला काय अर्थ आहे? खरंच आपला मोकळा वेळ आपल्याला विसावा देणारा हवा. सध्या आपल्या मोकळ्या वेळातून आपल्या शरीराला - मनाला विश्रांति मिळते का?

१. आठवडा संपला. दोन दिवस सुट्टी मिळतेय म्हटलं की, 'चला छोटीशी सहल काढू !' असं म्हणून गाड्या काढायच्या व 'वॉटर पार्कस् किंवा रिसॉर्टस्वर जाऊन दंगा. लांबच्या सुट्टीचं नियोजन तर महिना-महिना आधीच करावं लागतं. हॉटेल बुकिंग, बस-रेल्वे इ. प्रवासाचं बुकिंग मग कमीत कमी दिवसात जास्तीत जास्त बघणं -उपभोगणं म्हणजे अनेक प्रवासांचा शीण आणि वेगवेगळ्या ठिकाणचं खाणं. त्यातून परतल्यावर दुसऱ्या दिवशी कामावर रुजू व्हायचे असेल तर काही विचारायलाच नको ! जोपर्यंत शरीर आणि मन दोन्ही पूर्णपणे शिथील (Relax) होत नाही तोपर्यंत तन-मनावरचा थोडातरी ताण कायम राहतोच व संपूर्ण विश्रांती मिळत नाही.

२. दुसरा पर्याय म्हणजे टी.व्ही पहाणे. अधिक वेळ टिव्ही बघितला तर डोळे तर थकलेले असतातच पण मालिका बघाव्यात तर उसने ताण घेण्यासारखं वाटतं व वास्तवतेचं चित्र तर अधिक दारुण व तणावयुक्त असतं. मनाला क्लेशच देणारं व त्यावर प्रत्यक्ष आपण कोणतीच कृती रोजच्या दिवसामध्ये करण्यासारखी नसल्याने मन निष्क्रीय होत जातं. निष्क्रिय मनाची वाटचाल थकवा, नैराश्य याकडे जाते हे तर नवीन नाहीच. म्हणजे मन पुन्हा ताजतवानं, टवटवीत होऊन नव्या उत्साहाने कामाला लागायच्या ऐवजी जडत्व येतं व परिणाम एकूण उलटाच होतो.

३. मैत्री निरपेक्ष मैत्री हा खरं तर मोकळं होण्याचा उत्तम उपाय. एखाद्याशी उत्स्फूर्तपणे काहीही बोलता येणं, कधीही पटकन विचारांची देवाण घेवाण होणं हे खूप महत्त्वाचं असतं. पण अशी एकमेकांचा विकास साधत खोल मैत्री होणं हल्ली दुरापास्तच झालं आहे. प्रत्येकाची प्रतिष्ठा, पैसा, स्तर हे सगळंच किंवा काहीना काहीतरी इतकं मध्ये येतं की निखल संवाद होणंही जमत नाही.

म्हणजे आपली जीवनशैली बदलायला हवी हे निश्चित. आपला मोकळा वेळ अधिक सकारात्मक, चिरकाल आनंद देणारा व मनाचा हुरूप वाढवणारा कसा करता येईल? याचा नीट विचार व्हायला हवा नाही का?

एखादं कौशल्य किंवा एखादी कला जर अंगी बाणवली असेल तर एक सुंदर पर्याय आपल्यासमोर उभा राहू शकतो. एक निराळं विश्वच आपण स्वत:साठी निर्माण करू शकतो. अशी एखादी गोष्ट आपण शोधून काढली पाहिजे की जी करताना आपल्याला वेळ-काळाचं भान राहणार नाही. मन त्यात रमून जाईल, आनंद मिळेल व चिरकाल टिकणारं समाधान मिळेल.

विविध विषयांवरची पुस्तकं जमवणं, आवडती खास गाणी रेकॉर्ड करणं, ऐकणं ती जमवणं, एखादा खेळ - टेबलटेनिस, कॅरम, बॅडमिंटन इ. खेळणं किंवा मासे पाळणं, किंवा अगद भूमिती, भौतिकशास्त्र या सारख्या विषयांचा अभ्यास करणं त्यात प्रयोग करणं, एखादी नवीन भाषा शिकणं, चित्र काढणं, शिल्पकृती बनवणं अशा अनेक छंदांमध्ये अगदी ठासून आनंद भरलेला असतो. विषय कोणताही असो अट एकच - त्यात आपल्याला खराखुरा रस पाहिजे व फक्त आनंद लुटण्याच्या उद्देशाने अगदी निर्व्याजपणे आपण त्या विषयाच्या खोलात शिरत जातो व विषय विकसित होत जातो.

साहित्य, संगीत, नृत्य, शिल्प, नाट्य आणि चित्र या सहा ललित कला अशा वेळेस खूप उपयोगी पडतात याचं कारण ''कला'' या शब्दाचा अर्थच मुळी ''आनंद निर्माण करणारी'' असा आहे. ॥ कम-लाती या सा ॥''

अनंत काळापासून टिकून राहिलेल्या या कला अजूनही आपलं आनंद देण्याचं काम समर्थपणे करत आहेत. परंतु गरज आहे फक्त आपण त्यांच्याकडे मोकळेपणाने पाहण्याची - जे महत्त्व जगात करियर बनवणाऱ्या विषयांना म्हणजे गणित, शास्त्र या विषयांना आपण देतोअ तेच महत्त्व, तेच प्राधान्य, तोच मान त्याचवेळी जर कलांनाही दिला तर आपल्या जीवनात आपण खरा आनंद निर्माण करू शकू. आणखीन एक महत्त्वाचं म्हणजे कलेमध्ये ''नवनिर्मितीला'' भरपूर वाव असतो. 'फ्रोबेल' नावाच्या बालमानसशास्त्रज्ञाचे असं म्हणणं आहे की ''मानवी मन जेव्हा नवनिर्मिती करण्यात गुंग असतं तेव्हाच त्याचा जास्तीत जास्त वेगात विकास होत असतो'' आणि जेव्हा खऱ्या अर्थाने आपला विकास होत असतो तेव्हाच आपण खरे आनंदात असतो. नाही का?

तुम्ही म्हणाल हे सगळं ठीक आहे. माझं करियर ठराविक स्तरावर आलं, मी जरा स्थिरस्तावर झालो की करणारच आहे मी हे सगळं. वेळ मिळाला की पेन्टिंग करायचं आहे. मनसोक्त वाचायचं आहे - अशा अनेक गोष्टी मनात असतात. पण निवांत वेळ कधीच मिळत नाही. पण लहानपणापासून आपल्या छंदालाही तितकंच प्राधान्य द्यायची सवय लागली तर मोठेपणी हे अजिबात अवघड जाणार नाही - सहज जमेल नाही का? तुम्हाला काय वाटतं?

यासाठी ''बालपणाचं'' महत्त्व खूप आहे व यालाही शास्त्रीय आधार आहे. लहानपणी मानवी मेंदू अनेक अनुभव घ्यायला उत्सुक असतो. जे अनुभव मिळतात ते दगडावरच्या रेषेप्रमाणे मेंदूवर कोरले जातात. आठ वर्षांपर्यंतच्या वयाला जडणघडणीचा काळ (Formative Years) असं म्हणतात. त्यामुळे या वयापर्यंत विविध विषयांतील भरपूर अनुभव मुलांना द्यायला हवेत. दुसरं म्हणजे जो मेंदूचा भाग या वयात वापरात येत नाही त्या भागातील Neurons चक्क मरून जातात. त्यामुळे ज्या संकल्पना, जे विषय लहानपणी हाताळले जात नाहीत ते मोठेपणी शिकणं खूपच अवघड जातं.

अनुभव संपन्नता असली की आपोआप मुलाचा कोणत्या गोष्टींकडे ओढा आहे ते लक्षात येतं व त्याप्रमाणे ती कला, ते कौशल्य विकसित करता येतं असं झालं तर जणू काही जीवनभराची आनंदाची पुंजीच आपण आपल्या राहुलला, मीनाला, कौस्तुभला किंवा सानिकाला देऊ. नाही? खरंच प्रत्येक सीमाने आपल्याला राहुलला दिलेली ही एक अमूल्य देणगीच असेल.

आणि कल्पना करा सगळी पुढची पिढी जर सौंदर्यदृष्टी विकसित झालेली संवेदनशील व आनंदाचीच देवाणघेवाण करणारी निपजली तर हे जग किती सुंदर होईल?

पण नक्की बालमनांमध्ये या ललितकलांचे बीजारोपण कसं करता येईल? स्पर्धेकडे न धावता - आनंदाकडे कशी वाटचाल करता येईल? याविषयी वाचणार आहोतच... पण पुढच्या लेखात !

- सौ. रश्मी कुलकर्णी
१४, कमल सोसायटी,
गजानन महाराज चौक,
राम मारुती रोड, ठाणे (प.)

## 'दिशा' संशोधनाच

'दिशा' मधून बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात चालू असणारे संशोधन याची माहिती देणारे सदर लवकरच सुरू होत आहे.

- संपादक

# परिसर वार्ता

## आनंदीचाई केशव जोशी स्कूल

'श्वास' हा मराठी चित्रपट ऑक्सरसाठी रवाना होत आहे. त्यासाठी आर्थिक मदत म्हणून आमच्या शाळेच्या 'मराठी वाङमय मंडळाच्या' विद्यार्थ्यांनी इ. ५ वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांकडून रू. १,५००/- ही रक्कम गळा करून 'श्वास' च्या निर्मात्यांकडे पाठवली.

## विद्या प्रसारक मंडळाच्या शिक्षकांची लंडनला शैक्षणिक भेट

लींग फॉर दि एक्सचेंज ऑफ कॉमनवेल्थ टीचर (एलइसीटी) लंडन या संस्थेतर्फे ठाण्यातील डॉ. बेडेकर विद्या मंदिरातील शिक्षकांचा दि. ९ ऑक्टोबर ते १९ ऑक्टोबर २००४ पर्यंत शैक्षणिक दौरा यशस्वीरित्या संपन्न झाला. या शिक्षकांनी लंडन येथील काही प्राथमिक व माध्यमिक शाळांना भेटी दिल्या. ह्या दौऱ्यात लंडनचे शिक्षणाधिकारी अँड्रू मटर हे या दौऱ्यात संपूर्ण वेळ सहभागी होते.

न्यू, हॅम्पशायर येथील वेगवेगळ्या भागातील शाळांमधील शिक्षणपद्धती, त्यांची वैशिष्ट्ये, माहिती-तंत्रज्ञान व ज्ञानाची देवाणघेवाण यांचा शालेय पातळीवरील प्रगत अभ्यासक्रम, वैविध्यपूर्ण अध्यापन-पद्धती व त्यातील आधुनिकता यांचे निरीक्षण करता आले. तसेच अद्ययावत सायकॉलॉजी सेंटरमध्ये मानसिकरित्या दुर्बळ असणाऱ्या विद्यार्थ्यांना आत्मविश्वास कसा दिला जातो, त्याची आवश्यकता वगैरे गोष्टी भेटीद्वारे स्पष्ट झाल्या.

सीटी लर्निंग सेंटर व आयसीटी आणि आर्ट व डिझाईन यांची विद्यार्थ्यांनी केलेली प्रात्यक्षिके, माहिती तंत्रज्ञानाची प्रगती वगैरे गोष्टी पहावयास मिळाल्या.

लंडन दौऱ्यात विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, दुभाषी डॉ. आगरकर, वि. प्र. मंडळाच्या डॉ. बेडेकर विद्यामंदिर माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. सविता केळकर, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनुराधा मळेकर व इतर आठ शिक्षकांचा ह्यात सहभाग होता. माध्यमिक विभागाच्या सौ. उषा कळमकर, सौ. सुनीता देशपांडे, सौ. अपर्णा भट, सौ. वंदना अडसुळे तसेच प्राथमिक विभागाच्या सौ. वैदेहि गांगल, सौ. मधुरा कोर्डे, ए. के. जोशी (इंग्रजी माध्यम) शाळेच्या सौ. मेघा लाड, विलास बळेल, पूर्व प्राथमिक विभागाच्या सौ. अंजली पटवर्धन हे सर्व शिक्षक ह्यात सहभागी झाले होते.

वि. प्र. मंडळाचे कार्याध्यक्ष, ठाणे विजय बेडेकर व डॉ. सुधाकर आगरकर, कल्याण यांच्या सहकार्याने हा दौरा यशस्वी झाला.

## पुस्तक प्रकाशन - दि. ४ डिसेंबर २००४ रोजी

'सध्या सामाजिक परिवर्तन मोठ्या प्रमाणात होत असून साहित्यात नवी पिढी सक्रीय होत आहे. तसेच नवे नेतृत्व उदयाला येत आहे. महाराष्ट्र भक्कम आणि प्रगल्भ होण्यासाठी साहित्य तळा-गाळापर्यंत पोहोचून पतिवर्तनाचा ध्यास घेणे गरजेचे आहे.' असे प्रतिपादन अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष प्रा. केशव मेश्राम यांनी केले.

मराठी ग्रंथ संग्रहालय, शारदा प्रकाशन, ग्रंथपंढरी आणि इतर अनेक संस्थांच्या विद्यमाने आयोजित केलेल्या सत्कार समारंभास उत्तर देताना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर पां. के. दातार, कवी राम कदम, प्रा. दामोदर मोरे, हेमंत काणे, प्रा. संतोष राणे उपस्थित होते. शारदा

प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या कवी राम कदम यांच्या 'पानातील माणसे' या पुस्तकाचे प्रकाशन प्रा. केशव मेश्राम यांनी केले.

प्रमुख वक्ते म्हणून बोलताना जोशी-बेडेकर महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा. दामोदर मोरे म्हणाले सर्वांना यश दिसते. यशामागचे हात दिसत नसतात. हे हात फुले-आंबेडकरांचे आहेत. त्याचे फळ म्हणजे केशव मेश्रामांची साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड होणे हे आहे. वाहत्या पाण्यासारखे लिहिणारे मेश्राम माणसांवर प्रेम करणारे व्यक्तिमत्त्व आहे. नवोदितांना दिशा देतात ते कायम पुढे असतात. दलित आत्मचरित्राची सुरुवात दया पवार यांच्यापासून सुरू झाल्याचे सांगितले जाते. परंतु प्रा. मेश्राम यांचे 'हकिकत आणि जटायू' हे खूपच अगोदर प्रसिद्ध झालेले आहे. पोखरण, घगाडा, शब्दबंध यासारख्या अनेक पुस्तकातून त्यांनी चाकोरीबाहेरचे वेगळे काही करण्याचा प्रयत्न केला. अनेक कष्टाची कामे करून जीवनाचा आनंद कोमेजू दिला नाही. सतत नव्या माणसांच्या शोधात राहून चांगले तेच करीत रहाण्याचा त्यांनी आदर्श आमच्यापुढे ठेवला. एक प्राध्यापक, लेखक, कवी, वक्ता अशा बहुपेडी व्यक्तिमत्त्वाचे प्रा. मेश्राम म्हणजे सर्वांना सोबत घेऊन पुढे जाणारे आहेत.

प्रा. केशव मेश्राम यांच्या सत्कारासाठी ठाण्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र दातार यांनी केले.

## यांच्या जाण्याचे दुःख आहेच

वर्ष सरता सरता गेल्या वर्षात सोडून गेलेल्या विविध उत्तुंग काम केलेल्या अनेकांची आठवण मन व्यथित करते. या पैकी काही नाव आठवतात ती -

- डॉ. वा. ना. बेडेकर
- श्रीकृष्ण दळवी
- स. पा. जोशी
- वि. रा. परांजपे
- निरंजन उजागरे
- अरुण कोल्हटकर
- कवी शंकर रामाणी
- वसंत बापट
- भाऊ फाटक
- दत्तोपंत ठेंगडी
- विजय हजारे
- मुल्कराज आनंद
- मेहमूद
- लक्ष्मीकांत बेर्डे